
श्रीकांत भोसले

# आई विरुद्ध बाई



# आई विरुद्ध बाई

श्रीकांत विष्णु भोसले

ई साहित्य प्रतिष्ठान

# आई विरुद्ध बाई

लेखक :- श्रीकांत विष्णु भोसले
मोबाइल नंबर :- 8291816022
ईमेल आयडी :- bshrikant19@gmail.com
घरचा पत्ता :- न्यू भारतनगर, खोली क्रमांक – 41, एच पी कॉलनीजवळ,
वाशिनाका, चेंबुर, मुंबई – 400074
कार्यालयीन पत्ता :- Shoppers Stop Ltd., Krushal commercial complex,
M.G. Road, Chembur ( West ) , Mumbai – 400089

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

## प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन :२ ऑक्टोबर २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

अर्पण पत्रिका.........................

प्रेमात पडलेल्या,

प्रेमात पडण्यास उत्सुक असणाऱ्या

आणि अजून पर्यन्त न पडलेल्या

सर्व मित्र-मैत्रिणींना

ह्या प्रेमाच्या दोन गोष्टी अर्पण करत आहे......

श्रीकांत भोसले

# मनोगत :-



प्रेमात पडण्याच्या वयात तर प्रेम होतंच पण प्रेमात पडण्याचं वय सरल्यावरही प्रेम होतं हे सिध्द करणाऱ्या या दोन गोष्टी. या दोन्ही गोष्टी गेल्या बऱ्याच दिवसापासून मनात कालवाकालव करत होत्या, एकदाच्या कागदावर उतरल्या आणि मन एकदम शांत झालं.

तारुण्यातून एक पाऊल पुढं सरकल्यावर आपोआप आपल्या खांद्यांना जबाबदाऱ्यांचं ओझं जाणवू लागतं. डोळ्यासमोरची स्वप्न जवळ आल्यासारखी दिसू लागतात. आपल्या अनुभवाने आपण बरेच शहाणे सुद्धा झालेले असतो. नकळत आपल्याला जाणवतं की आपल्यापेक्षा लहानच नाही तर मोठी मंडळी सुद्धा आपल्याकडून काहींना काही शिकतायत. तेंव्हा तर आपण शहाणे असू वा नसो, शहाण्यासारखच वागावं लागतं. वेड्यासारखं काही करण्याची परवानगी ही नसते आणि इच्छाही.

आणि अशाचवेळी हृदयाच्या आतून प्रेमाची एक हाक येते आणि शहाण्या जीवाला वेडं करण्याचा प्रयत्न सुरू करते. एकाच शरीरात असलेलं एकटं मन दोन एकमेकाच्या विरुध्द असलेल्या पात्रांमध्ये विभागलं जातं आणि सुरू होते आतल्या आत एक वेगळयाच प्रकारची घुसमट.

प्रेमामध्ये वेडं होऊन प्रेमाच्या सुसाट वाऱ्याबरोबर उडायला एक मन उत्सुक असतं तर दुसरं शहाणं मन त्याला थांबवत असतं. अश्यावेळी या समजूतदारपणाचा आणि शहाणपणाचा खूप राग येतो. आपल्या अनुभवाचं पोतं बऱ्यापैकी भरलेलं असतं. त्यामुळे वेडं झाल्यामुळे किती नुकसान होणार आहे हे ही दिसत असतं आणि वेड लागल्यामुळे आपल्याला किती सुख मिळणार आहे हे ही कळत असतं.

अखेर आपल्याकडे दोन पर्याय उरतात. निवडायचा मात्र एकच असतो. प्रत्येक पर्याय काहीतरी देणार असला तरी काहीतरी हिसकावून घेणारा ही असतो. आणि याची आपल्याला जाणीव असते. हीच परिस्थिति या कथेमधील पात्रांच्या आयुष्यात ही येते आणि ते सुद्धा दोन्हीपैकी एक पर्याय निवडतात.

आता तुम्ही ठरवा की जे काही त्यांनी निवडलं ते कितपत बरोबर होतं आणि कितपत चुकीचं.

वाचून झाल्यावर प्रतिक्रिया कळवायला विसरू नका. तुमच्या प्रतिक्रिया मला माझ्या पुढच्या लेखनासाठी खूप प्रेरणादायी असतील.

शेवटी, ज्यांच्यामुळे हे पुस्तक तुमच्यापर्यंत पोहचवू शकलो, त्या ईसाहित्य प्रतिष्ठानचे खूप खूप आभार.

**- श्रीकांत विष्णु भोसले**

मोबाइल नंबर :- 8291816022

ईमेल आयडी :- bshrikant19@gmail.com

# साक्षीदार (Witness)..................

1)

पप्पांना ॲडमिट करून पंधरा वीस मिनिटे झाल्यानंतर मी डॉक्टर अमित यांची भेट घेतली. त्यांचे ते शब्द नुसतेच कानात गुंजत होते.

“ कंडिशन खूप क्रिटीकल आहे. बट वी विल ट्राय अवर बेस्ट. काहीच सांगू शकत नाही. “

पप्पावर असलेल्या माझ्या रागामुळे मी कधीच त्यांची विशेष अशी काळजी घेतली नव्हती पण आज जरा काळजी वाटत होती.

डॉक्टरांच्या पुढच्या उत्तराची वाट बघत मी बाहेर बाकावर बसून राहिलो. आणि बसल्या बसल्या लहानपणी घडलेल्या घटना एक एक करून आठवू लागल्या.

***

नुकतीच तिसरीची चाचणी परीक्षा पार पडली होती. त्यामुळं अभ्यास पण जास्त नव्हता. तसल्यात रविवार म्हणून मी तोंडावर ऊन पडूपर्यंत झोपलो होतो. मागच्या भिंतीला एक छोटीशी खिडकी होती. त्यातून येणाऱ्या सूर्याच्या किरणांनी शेवटी मला उठवलचं. पण अंगात आलेल्या आळसामुळे मी तसाच पडून राहिलो. बाजूला स्वाती गाढ झोपली होती. गेल्याच महिन्यात तिचा पहिला वाढदिवस खूप जोमात साजरा केला होता.

स्वयपाक घरातून एकसारखा भाकरी बडवत असल्याचा आवाज येत होता. आईच बडवत असेल असं गृहीत धरून मी डोळे बंद करून अजून झोपण्याचा प्रयत्न करत होतो. तेंव्हाच दारातून आजीचा ओरडल्याचा आवाज कानावर पडला.

“ सुमे, आवरतं घी जरा................. “

आजीचा आवाज ऐकल्याबरोबर मी दचकून जागा झालो कारण आजी आली म्हणजे मावशी सुद्धा आली असणारच. मी चटकन खाटेवरून खाली उतरलो आणि स्वयपाकघराच्या दरवाज्यावर गेलो तर आतमध्ये मावशीच भाकरी बडवत होती. माझ्या तर आनंदाला सीमाच उरली नाही. मी पळत जाऊन तिच्या कुशीतच शिरलो. पीठ लागलेल्या हाताने तिने माझ्या डोक्यावरुन हात फिरवला आणि लाड करत म्हणाली,

“ उठलं ग बाई माझं सोनं,.............. “

“ तू कवा आलीस ? “

“ दिस उगायला आली, तू निजला हुतास अजून. “

“ आई परत दवाखान्याला गेली काय ? “

अलीकडे आईला काय होत हुतं कुणास ठाऊक ? दर पंधरा वीस दिवसाला ती बेसुद्ध होऊन पडायची. आणि मग चार पाच दिवस दवाखान्यात राहून तोंडावर उसनं अवसान घेऊन परत यायची.

इथून अर्ध्या तासावर हुईल इतक्या अंतरावर माझ्या आईचं माहेर हुतं. त्याच्यान जेंव्हा जेंव्हा आई ॲडमिट व्हायची त्या वेळी मावशीच सगळं घरातलं काम बघायची. पण उजव्या पायाला लकवा मारला असला तरी लंगडत लंगडत ही आजी मावशीबरोबर का यायची ? हे मात्र काय कळत नव्हतं.

मी आईला विसरलो पण मावशीला विसरू शकलो नाही, सोळा सतरा वर्षाची होती ती त्यावेळी. रंग जरी सावळा असला तरी तिचे डोळे मात्र खूप मादक होते. शरीर ही इतक मादक होतं की रस्त्याने जाताना गावातली पोरं वळून वळून तिच्याकडं बघायची. तिची ती जाड जुड केसांची वेणी खांद्यावरून पार कमरेपर्यंत यायची. चालता चालता जेंव्हा ती अंग झटकून या खांद्यावरची वेणी त्या खांद्यावर उडवायची त्यावेळी मात्र बघणाऱ्या पुरुष माणसांचं पाणी पाणी व्हायचं.

खरं सांगतो, त्यावेळी मी तिसरीला नसून तेरावीला असतो ना तर नक्कीच तिच्या प्रेमात पडलो असतो.

कुशीतून बाहेर काढून मला खाली बसवत ती म्हणाली,

“ त्वांड धुन घी, गरम गरम दूध अन भाकरी खा म्हन्स. “

मी मान डोलवत उठलो आणि बाजूला मोरीत तोंडावर पानी मारणार तितक्यात परत आजी ओरडली.

“ अग ये सुमे………… सरू गेली ग…………………… “

आजीच्या ओरडण्यामध्ये खूप भीती होती. जणूकाही तिच्यावर संकटच कोसळल असावं. पण ज्यावेळी मला तिच्या शब्दामांगचा अर्थ कळला त्यावेळी मात्र मीच सुन्न झालो.

मावशीनं कानाला मशीन लावली नव्हती म्हणून तिला ऐकू आलं नाही. जवळ जाऊन मी जेंव्हा तिला सांगितलं तेंव्हा ती हातातली भाकरी परत करवटावर टाकून आजीकडे धावली पण मी मात्र हळूहळू दरवाज्याच्या दिशेने गेलो. बाहेर आजीबरोबर बाजूचा गणपाकाका आणि आणखीन दोन तीन पुरुष मंडळी उभी होती.

“ रस्त्यातच जीव गेला म्हणून सांगितलं डाक्टरांन, तस पळत आलूया इकडं. समाधान ईत असील मागं - वहिनीस्नी घिऊन. “

खरतर संकट आजीवर नाही तर आमच्या घरावर कोसळल होतं. आई मेली हे मान्य करणंच इतक अवघड होतं की माझं मलाच कळेना – कसं वागायचं आता ?

आजीसारखं बांध फोडून रडायचं की मावशीसारखं समोरच्याला शांत करत रडायच. त्यावेळी जर मला आई मेल्यानंतर येणाऱ्या दुखांची कल्पना असती तर मी सुद्धा हुंदके देऊन रडलो असतो. पण मी आपलं हुंबऱ्यावर बसून गुडघ्यात मुंडकं घालून आतल्या आतच रडत होतो.

अचानक माझ्या डोक्यावरुन मावशीचा हात फिरला आणि मी उठून लगेचच तिला मिठठी मारली. हाताला धरून ती मला बाहेर गोठ्यात घेऊन गेली. जाता जाता मी सभोवार एक नजर फिरवली. बरीच माणसे जमा झाली होती. काही बाया सुद्धा आल्या होत्या.

गोठ्यामध्ये मावशीच्या मांडीवर डोके ठेवल्यावर मला रडूच येईना. कारण तिच्या कुशीत आणि आईच्या कुशीत कसलाच फरक नव्हता. त्याचवेळी कोणीतरी आमच्या बाजूला स्वातीला आणून बसवलं. त्यावेळी मात्र मला सत्याची प्रखर जाणीव झाली आणि कळालं की आमचं वाईट झालं आहे.

मावशी तर चार दिवसांची पाहुणीच होती. त्यानंतर मी आणि स्वाती अनाथच होतो. अर्ध्या एक तासानंतर स्वाती भूक लागली म्हणून रडू लागली. तिच्यासाठी आता अमृतासारखं असलेलं आईच दूध संपल होतं म्हणून दुधाची बाटली आणण्यासाठी स्वातीला माझ्याजवळ बसवून मावशी परत घरात गेली.

मावशी गेल्याबरोबर मला सुद्धा रहावलं नाही, मी ही तिच्या मागोमाग घराकडं निघालो. स्वाती रडत होती पण एकवेळ मला सुद्धा आईला बघायचं होतं,

समोर बरीच पुरुष माणसे चर्चा करत उभी होती. घरामधून मात्र जोरजोरात रडल्याचा आवाज येत होता. एकतर पहिलच मन इतकं उदास होतं आणि तसल्यात हा रडण्याचा आवाज ऐकून आणखीनच थरथरायला लागलं. आतल्या बाया नुसत्याच रडत नव्हत्या तर आईला प्रश्न ही विचारत होत्या.

" का गेलीस, सोन्यासारख्या लेकरास्नी वाऱ्यावर सोडून ? "

" समाधाननं कुणाच्या तोंडाकडं बघून जगायचं ? "

बरीच प्रश्नं होती पण इतकीच लक्षात राहिली. माणसांच्या नजरा चुकवत मी दरवाज्यावर पोचलो आणि आतल ते दृश्य पाहून मी थक्कच झालो.

एखाद्याच्या लग्नाला निघाली असावी तशी नटली होती माझी आई. अंगात हिरव्या रंगाची नववारी साडी, हातात चुडा, गळयात नवीन बनवलेल मंगळसूत्र आणि घोरमाळ, कपाळाला कुंकवाचा टीका. नटलेल्या माझ्या आईला या लोकांनी भिंतीला बांधून ठेवलं होतं. तिची मान वारंवार खाली पडत होती आणि बाजूला बसलेली एक बाई ती परत परत सरळ करत होती.

हे सारं बघून मी पार घाबरूनच गेलो. हे काय चाललंय हेच कळत नव्हतं. पण आज या गोष्टीमागचा अर्थ कळतोय.

" आस्तित्वाच्या गाभाऱ्यात अडकलेला एक जीव, एक दिवस आपलं आस्तित्व सोडून जातो आणि मागं राहतं त्याचं ते निर्जीव शरीर. सारं आयुष्य अपुरं पडतं त्या शरीराचे डोहाळे पुरवण्यात, पण मेल्यावर मात्र त्याचे सोहाळे सुरू होतात.

त्याला सजवलं जातं, दागिन्यांनी नटवल जातं, त्याचे गुणगान गायले जातात, एवढचं नाहीतर त्याला खांद्यावर ही घेतलं जातं.

आणि अखेर फेकून देतात अग्नीच्या लालशार डोहात.

शेवटी हे सारं प्राक्तन संपवल जातं ते एका धर्माच्या नावाखाली.

आता कळलं की हा तर त्या शरीराचा धर्म होता जो त्या शरीराबरोबर संपला मग त्याचा धर्म काय होता जो या शरीरामध्ये जीव म्हणून अस्तित्वात होता. जो फक्त शरीर बदलत असतो, मरत कधीच नाही. “

बऱ्याच प्रश्नांची उत्तरे सापडलीच नाहीत आणि ज्यांची सापडली ती मात्र जीवघेणी होती.



2)

आईला जाऊन आता पंधरा दिवस होत आले होते. आई मेल्याचं दुःख अजून पातळ झालं ही नव्हतं की तोच मावशी म्हणाली,

“ उद्या म्या परत जाणार हाय, तवा पप्पाची अन सोताची काळजी घी, शाण्या पोरासारखं वागायचं. सोताची कापड सोताच धुन घालायची. पप्पाला तरास द्यायचा नाय. अन दर रविवारच्याला येत जा मुंजेवाडीला. येताना शाळेची कापड आणायला इसरायचं नाय - धुयायला. “

तिला “ हो “ म्हणणं सुद्धा जिवावर आलं होतं. आणि ती मात्र माझ्या उत्तराची वाट न बघता तशीच पुढं बोलत राहिली.

“ तुझा बा लय चांगला माणूस हाय पर त्याच्याच वाट्याला यावं का हे दुख ? खरं बोलायचं झालं तर माझा भी पाय उचलंना. पर काय करायचं ? जावं तर लागंल..................... “

पुढ काय काय बोलली कुणास ठाऊक ?

काल शाळेत मास्तरांनी पालकांची सही घेऊन ये म्हणून चाचणी परीक्षेचे मार्कलिस्ट दिले होते पण मावशी जाणार आहे या टेन्शन मध्ये मी विसरूनच गेलो. संध्याकाळी पप्पा बैलगाडीत आजी आणि मावशीला सोडण्यासाठी मला पण घेऊन जाणार होते. स्वाती मात्र मावशीचं लग्न होऊपर्यंत मावशीबरोबरच राहणार होती.

शाळेला जाण्यासाठी चालत चालत निम्या वाटेवर आलो असेल की मला एकदम सही घ्यायचं लक्षात आलं. मास्तरांनी आजच्या आज सही करून आणायला सांगितलं होतं. मी लागलीच घराकडे पळत सुटलो. वाटेत लक्षात आलं की घरातून निघालो तेंव्हा मावशी एकटीच होती घरात. सही तर पप्पांची घ्यायची होती. आणि या अगोदर पप्पा कुठे बाहेर गेले असतील तर आई सही करायची पण आता ती पण नव्हती.

आई नसली तरी मावशी होती की.......... “

घराजवळ पोचलो तेंव्हा दार बंद होतं. पण बाहेरून कडी नव्हती. कदाचित सगळं काम आटपून मावशी झोपली तर नसेल ? बाहेरून आवाज द्यावा तर तिला ऐकू जाणार नाही हे नक्की होतं कारण दिसायला कितीही सुंदर असली तरी तिला लांबच खूपच कमी ऐकू यायचं आणि तसल्यात झोपली असेल तर तिला हलवूनच उठवावं लागायचं.

विचार केला.

छप्परामध्ये आमची खिडकीपर्यंत पोहचेल इतकी लांब शिडी होती. ती मी घराच्या मागे जाऊन खिडकीला लावली. पिशवीतली पाण्याने भरलेली बाटली हातात घरून मी चढू लागलो. खिडकी जवळ पोचल्यावर मी जेंव्हा आत बघितलं तेंव्हा मावशी जागीच होती. दोन्ही हात वर करून ती बाजूच्या भिंतीला टेकून उभारली होती. तिची ओढणी खांद्यावरून पायाजवळ पडली होती. आणि पप्पा तिच्या हातात हात घालून तिच्याकडेच बघत होते.

पप्पांचा चेहरा दिसत नव्हता पण मावशीने मात्र कसेतरीच तोंड केलं होतं. जणू काही तिला जे काय होतय ते आवडत नव्हतं,. पप्पा हळूहळू त्यांचं तोंड मावशीच्या तोंडाजवळ घेऊन जात होते. मावशी आणखीनच घाबरून पप्पाकडे बघू लागली, तरीपण ती पप्पांना अडवत नव्हती.

नेहमी केसांना विचरून टापटीप ठेवणाऱ्या मावशीची केसं आज मात्र विस्कटलेली होती. आता तर दोघांचे ही ओठ अगदी जवळ आले होते. मावशीने सुद्धा तिचे डोळे मिटून घेतले. मी जे काय बघत होतो ते बघून मला किळस यायला हवी होती पण मला सुद्धा बघायला मज्जा येत होती. उतरण्यासाठी म्हणून खाली घेतलेला पाय मी परत वर घेतला.

ओठांना ओठ लागणारच होते की तेवढ्यात मावशीनी पप्पाच्या हातातून आपले हात काढून घेतले आणि त्यांना पाठीमागे ढकलून दिले. ढकलल्यानंतर पप्पा मागे सरकून उभारले. मावशीने आता डोळे उघडले. मादक हास्य करत तिने तिची विस्कटलेली केसं ठीक केली आणि त्याच नजरेने पप्पांच्या नजरेला नजर दिली.

“ कायच करायचं नव्हतं तर कशाला आली माझ्याकडं ? “

पप्पा रागाला आल्यासारखे बोलले. पायातली ओढणी उचलून खांद्यावर ठेवत मावशी हळूहळू पप्पांजवळ गेली आणि त्यांच्या केसांवरून हात फिरवत म्हणाली,

“ आई संग बोला, म्या तय्यार हाय. “

आणि दरवाज्या उघडण्यासाठी दाराजवळ गेली. पप्पांना बघण्यासाठी जेंव्हा ती परत वळली त्यावेळी अचानक तिची नजर माझ्याकडे गेली आणि मी चटकन खाली वाकलो. पप्पांना कळलं तर काठी तुटूस्तुका मारतील म्हणून मी शिडीवरून खाली न उतरता थेट उडीच मारली. आणि शाळेकडे पळत सुटलो.

पाच मिनिटाच्या आत घरातून शाळेत पोचल्याचा विश्वविक्रम मी त्याच दिवशी केला.

3)

त्याच दिवशी मला कळायला पाहिजे होतं की पप्पा आणि मावशी मध्ये काहीतरी सुरू आहे पण त्यावेळी इतकं ध्यानात नाही आलं.

दोन वर्ष अशीच गेली. दर रविवारी मी मावशीकडे जायचो तेंव्हा प्रत्येकवेळी मावशीला म्हणायचो,

“ तू स्वातीला घिऊन ये ना आमच्या घरी………………. “

तेंव्हा ती म्हणायची,

“ तुझ्या बा ला सांग, यिऊन घिऊन जा म्हणावं. “

आणि मग पप्पांना येऊन सांगायचो तर ते म्हणायचे,

“ आणूया बरं का, स्वाती शाळला जायला लागली ना मग घिऊन इवू मावशीला भी. “

हे जाऊन मी जेंव्हा मावशीला सांगितलं तेंव्हा मावशी भलतीच खुश झाली होती. कदाचित पप्पा तिच्या आईला विचारेल याची तिने आशाच सोडली होती.

“ आता अजून दोन वरिस दम काढावा लागंल……….. “

असं ती स्वतशीच म्हणाली होती.

बाबा मला नेण्यासाठी रविवारी संध्याकाळी यायचे तेंव्हा दोघे ही एकमेकांना स्पर्श करण्याचा एक ही चान्स सोडत नव्हते. पानी देताना हळूच एकमेकांची बोटे एकमेकात गुंतवून लगेच सोडवून घ्यायची. जेवण वाढताना काही क्षणांसाठी का होईना पण नजरा एकमेकात अडकवून ठेवायच्या. मला पप्पी घेण्याचं

नाटक करून ती हळूच पप्पांच्या चेहऱ्यावरून हात फिरवून घ्यायची. आजूबाजूला कोणी नसलं की हाताला किस्स करून पप्पांच्या दिशेने हवेत सोडायला ही ती घाबरायची नाही.

आज जितकं मला आठवतं त्यावरून एक गोष्ट सिद्ध होते की मावशी वेडी झाली होती पप्पांच्या प्रेमात पण पप्पाकडे बघितल्यावर ते वेडे झाल्यासारखे वाटत नव्हते, पण मावशी जे काय करत होती त्यातून त्यांना खूप आनंद मिळत होता हे मात्र नक्की.

बघता बघता दोन वर्ष पार पडली.

मी पाचवीला गेलो. गावात फक्त चौथीपर्यन्तच शाळा होती तेंव्हा बाबांनी मला तालुक्याला शाळेत घातलं आणि माझ्या मर्जीविरुद्ध मला होस्टेलमध्ये ठेवलं.

दोन वर्ष दर रविवारी मावशीला भेटत असल्यामुळे आईची तितकी आठवण येत नव्हती. पण आता मात्र आईची खूप आठवण येऊ लागली. वयाप्रमाणे शहाणपण ही वाढत चालल होतं. पोरपोरी प्रेम करतात आणि मग लग्न करतात अश्या चर्चा आता आम्हा मित्रांमध्ये होऊ लागल्या. आणि मग माझ्या लक्षात आलं की जर पप्पानी मावशी बरोबर लग्न केलं तर ती हक्काने आमच्या घरात येऊन राहू शकते आणि मी तिला आई म्हणू शकतो.

मी निश्चय केला की यावेळी मी जेंव्हा घरी जाईन तेंव्हा पप्पांना सांगीन की मावशी बरोबर लग्न करा म्हणून.

हॉस्टेलमध्ये राहायला लागून दोन महीने झाले असावेत. एका शनिवारी संध्याकाळी पप्पा मला नेण्यासाठी म्हणून तालुक्याला आले. उद्या सुट्टी असल्यामुळे मास्तरांनी सुद्धा जाण्याची परवानगी दिली.

शेवटचे दोन तास चुकवून आम्ही गावची बस पकडली. सूर्य अजून पुरता माघारी गेला नव्हता. संध्याकाळच्या त्या सुगंध वातावरणात मी घरासमोरच्या अंगणात आलो आणि बघतो तर काय ?

अंगात नववारी साडी, गळ्यात मंगळसूत्र, हातात हिरवा चुडा आणि भांगेत कुंकू भरलेली मावशी दारासमोर रांगोळी काढत होती. त्यातल्या त्यात एक क्लिप लावून मोकळी सोडलेली केसं खांद्यावरून खाली येऊन रांगोळीला स्पर्श करण्याचा प्रयत्न करत होती.

पप्पानी खरच मावशीशी लग्न केलं की काय ?

मन एकदम फुलून उठलं. एखादं सैराट झालेलं गाणं लागावं आणि त्यावर मी बेधुंद होऊन नाचवं असं वाटत होतं. मला दारावर बघताच उठून माझ्या गालावरून हात फिरवताना तिने माझ्या कपाळावर पप्पी घेतली. असं वाटलं माझी आई परत आली.

आता मी ठरवलं - पुढल्या वर्षापासून हॉस्टेल मध्ये राहायचं नाय. पप्पाकडून सायकल घ्यायची आणि सायकलवर शाळेला जायचं. आत गेल्यावर मात्र आजीला खाटेवर बसलेली बघून मला रागच आला.

दोन महिन्यांनंतर पोट भरून जेवलो होतो.

जेवण झाल्यावर पप्पा खाटेवर जाऊन झोपले आणि समोरच्या भिंतीला लागून मावशीनी आमच्यासाठी अंथरूण टाकलं. भिंतीला लागून स्वाती झोपली. तिच्याबाजूला मावशी आणि मग मी. माझ्या बाजूला आजी झोपली.

कशी कुणास ठाऊक पण रात्री अचानक मला जाग आली. डोळे उघडले तर सर्वत्र अंधारच अंधार होता. आणि कानावर एक वेगळयाच प्रकारचा आवाज पडत होता. खाटेला कोणीतरी एका सुरात हलवत होतं. सैल झालेले खाटेचे नट वाजायचे,

मग थांबायचे आणि परत वाजायचे. एवढ्या अंधारात खाटेला कोण हलवत होतं काय कळत नव्हतं.

मी हळूच बाजूला हात केला तर मावशी अंथरुणावर नव्हती. मी हात लांब केला तर स्वातीचा हात लागला. पलीकडे चाचपलं तर आजी झोपली होती.

एवढ्या रात्री मावशी कुठ गेली असलं आणि पप्पा इतक्या जोरजोराने खाट का हलवतायत हा प्रश्न सुटण्याच्या अगोदर येणारा आवाज शांत आला. शांतता पसरल्याबरोबर पप्पा आणि मावशीने सुटकेचा निश्वास सोडल्याचा हलकासा आवाज पूर्ण खोलीत गुंजला.

थोड्याच वेळात मावशी माझ्या बाजूला येऊन झोपली आणि मग मी तिला मिठ्ठी मारून शांत झोपी गेलो.

सकाळी उठलो तेंव्हा मावशी कालच्यासारखी नटून कापडाची बॅग भरत होती आणि तिच्या समोर बसून आजी तिला काहीतरी बडबडत होती.

“ तुझ्या भावाला काडीची भी अक्कल नाय. पावण्याबरोबर भांडण करून बसलाय. चांगली पावणं गाठ पडली हायती त्ये एक नशीब. इथ इवून घिऊन जायला तयार झाल्याती. त्यातच भैरोबा पावला ग बाई. तू आपलं नीट रहा. आणि सुखाचा संसार कर......”

आजीचं बोलणं काय कळत नव्हतं. तेंव्हाच मावशी म्हणाली,

“ तू कवा जातीस परत ? “

“ म्या नाय जात त्या भाडखाऊकडं, इथंच राती जावयाकडं. “

आणि मग बघता बघता काही माणसे आली. त्यातल्याच एकाने मावशीचा हात पकडला आणि तिला घेऊन गेला. पप्पा दारावर उभा राहून फक्त तिला बघत होता. मावशी सारखं पाठीमागं वळून बघत होती. अजूनही आशा सोडली

नव्हती तिनं. त्या दिवशी पप्पांचा खूप राग आला. आणि रागाच्या भरात गोठ्यात जाऊन मी त्यांना विचारलं.

" तुम्ही का नाय केलं मावशीशी लगीन ? "

पप्पानी उत्तर द्यायचं सोडून माझ्या कानाशीलातच लगावली.

आजीकडुन कळालं. – चार पाच दिवसापूर्वी पावणे बघायला आले. त्याच दिवशी त्या लोकांनी होकार कळवला. दुसऱ्या दिवशी मावशी रागाच्या भरात आजीकडं आली आणि आजपर्यंत सगळ्याच पाहुण्यांना नकार कळवत आलेल्या मावशीनं लागलीच होकार कळवला. मामाला हे लग्न मान्य नव्हतं पण मावशीने हट्ट करून हे लग्न केलं. आणि आजीला भी हेच पाहिजे होतं.

त्या दिवशी एक गोष्ट कळली. सुख हे फक्त एकाच क्षणासाठी येतं आणि तेवढ्यातच ते उपभोगायचं असतं.

रागाच्या भरात मी रविवारीच तालुक्याची गाडी पकडली.

पुढच्या दिवशी सोमवारी सकाळी शाळेत जाण्यासाठी होस्टेलमधून बाहेर पडलो आणि बघतो तर समोर पप्पा उभे.

तोंड सुजलेलं, डोळे खोल गेलेले. जणूकाही कुणीतरी यांचं सर्वकाही हिरावून घेतलं असावं. चेहऱ्यावरून तर असं वाटत होतं की काहीतरी वाईट घडलं आहे किंवा काहीतरी वाईट घडणार आहे. पप्पांची अशी अवस्था मी यापूर्वी कधीच बघितली नव्हती.

पळतच त्यांच्याकडे गेलो. मी समोर गेल्या गेल्या त्यांनी मला गच्च मिठ्ठी मारली आणि अचानक बांध फुटल्यासारखं जोरजोरात रडू लागले. आजूबाजूचे लोक आ वासून आमच्याकडे बघत होते आणि मला काहीच कळत नव्हतं. मी पप्पांना विचारत होतो.

" काय झालं पप्पा ? "

कित्येकवेळा विचारलं असेल पण ते नुसतच रडत होते. आजूबाजूच्या माणसांनी येऊन मला त्यांच्या मिठठीतून सोडवलं तेंव्हा कुठे त्यांनी तोंड उघडल.

" सुमी सुधीक गेली रं.................. "

माझ्या हातातलं पुस्तक खाली गळून पडलं. इतक पटापट सगळं घडत होतं की मलाच कळत नव्हतं की हे काय होतय ? पप्पा पुढ सांगत होते.

" रविवारी सकाळपारी गेली, दुपारच्याला सगळयास्नी जेवू घातल अन सांच्याला फास लावून घेतला. '

खरतर मला पप्पांची दया यायला हवी पण मला त्यांचा राग येत होता, त्यांनीच मारलं होतं माझ्या मावशीला, मावशीला नायतर माझ्या आईला. नव्हती हिंमत तर कशाला दाखवायची आशा तिला ? कशाला थांबवलं दोन वर्ष तिला ? का केलीत तिच्याशी जवळीक ?

मावशीचं मन तिच्या नवऱ्याबरोबर झोपायला मान्य होत नसावं कदाचित, म्हणून तिने रात्र होण्याअगोदर आपलं शरीर संपवलं. ती तिच्या प्रेमाला जागली. पण पप्पा?

आई मेल्यावर चौथ्याच दिवशी कामावर गेलेला माझा पप्पा मावशी मेल्यावर मात्र पंधरा दिवस तापाने फणफणत होता. कोणासंगं काय बोलत नव्हता. आणि मी एका नालायक मुलासारखा त्यांना बघायला ही गेलो नाही.

त्यांच्यावरचा हा राग आजपर्यंत माझ्या मनात राहिला. कधी बोलून दाखविला नाही पण माझ्या वागण्यात तो नेहमीच राहिला.

4)

आज जेंव्हा पप्पा दवाखान्यात मरणाशी दोन हात करतायत तेंव्हा मला त्यांना विचारावं असं वाटलं. मी बाकावरून उठलो आणि आय सी यू चा दरवाजा उघडून आत शिरलो.

पप्पा अजून ही दरवाज्याकडे बघत होते. आत जाऊन मी त्यांच्याजवळ बसलो आणि त्यांचा हात हातात घेतला. हाताचा स्पर्श होताच त्यांचं लक्ष माझ्याकडं गेलं.

" दरवाज्याकडं काय बघताय ? " मी विषयाला सुरुवात करावी म्हणून विचारलं.

त्यांनी नकारर्थी मान डोलावली.

" तुम्ही मावशीशी लगीन का नाय केलत ? " मी सरळ विषयालाच हात घातला. प्रश्न ऐकताच त्यांनी परत एकदा दरवाज्याकडं बघितलं आणि हळूहळू त्यांच्या तोंडातून शब्द फुटू लागले.

" म...मला माईत व्हतं, माझ्या प्रेमाचा तू एकटाच साक्षीदार हाइस. तुला काय वाटलं तुझी मावशी मेली हाय ? नाय – ती बघ तिथं दारापाशी उभारलीया. "

मी दाराकडे बघितलं पण तिथं कोणच नव्हतं. ते पुढं बोलत होते.

" म्हणते - स्वातीच लगीन झालं. श्रीकांतला नोकरी लागली. आता चला. संसार करू. "

" पप्पा, तुम्ही मावशीशी लगीन करायला पायजे हुतं. आपल्या सर्वांच चांगलं झालं असत. "

" नाय रं बाळा, आपलं चांगलं झालं असतं. तिचं तर वाईटच झालं असतं. मला वाटलं – माझ्याशी लगीन करून मी तिला काय दिलं असतं. बाईच सपान असतं – तिचा स्वताचा एक नवरा असावा. तिला झालेली मुलं असावी. तिचं स्वताच सारं काही असावं. अन यातलं काहीच नव्हतं माझ्याकड. अन कुठल्या तोंडानं मागितलं असतं मी तिला - तिच्या आईकडं ? "

माझ्या हातात असलेला हात त्यांनी आणखीनच घट्ट पकडला. आणि म्हणाले,

" माझ्या लेकरांसाठी मी फकस्त एकलाच हुतो, त्यासनी सोडून मला आणखीन कुणासाठी जगायचं नव्हतं रं बाळा. "

आणि मग हळूहळू घट्ट धरलेला हात सैल सैल होत गेला.

पप्पा आणि मावशी हातात हात धरून दरवाज्यातून बाहेर जाताना दिसले. पुन्हा एकदा एक शरीर माझ्यासमोर पडलं होतं आणि त्यातला जीव स्वताच नवं आयुष्य जगण्यासाठी निघून चालला होता,

हे असलं सुद्धा प्रेम असतं असं कधी वाटलं नव्हतं.

मावशी मरून सुद्धा पप्पासाठी थांबली होती आणि पप्पा मात्र आमच्यासाठी अडकून पडला होता. मला माझ्याच रागाची लाज वाटू लागली.

पप्पाच्या चितेला आग देताना मला वाईट नाय वाटलं उलट समाधानाच वाटलं. माझ्यासाठी अडकून पडलेले पप्पा आज मोकळे झाले होते.

त्यांचा आणि मावशीचा संसार सुखाचा होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# आई विरुध्द बाई ..........................

1)

पावसाचे दिवस होते. त्यामुळे हवेत एकप्रकारचा गारवा होता. पहाटे पहाटे तर अंगावर पांघरूण घेऊन सारं अंग दुमडून झोपावं असं वाटत होतं पण घड्याळात साडेपाच वाजल्या होत्या आणि आता उठणं भाग होतं. तोंडावरचं पांघरून काढून डोळे उघडले तर घरात अंधार पसरलेला होता. देवघरात लावलेल्या जिरो बल्बचा मंद प्रकाश त्या अंधाराशी एकटाच झुंज देत होता.

डोळे उघडल्याबरोबर घरावर अंथरलेल्या पत्र्यांचा पांढरा रंग मात्र आज खूप ठळक जाणवला. घरात आणि आयुष्यात पसरलेल्या काळया अंधारात ते पत्रेच तेवढे पांढरे होते. डोळयावरच्या पापण्यांना जबरदस्तीने वर सारत मी उठून बसले. तर समोर हार घातलेला नवऱ्याचा फोटो नजरेसमोर आला आणि नवरा मेल्याची जखम परत ठणका मारू लागली. या जखमेला आता आयुष्यभर जपायचं होतं. आणि गेली सहा महीने जपत तर होते.

माझ्याबरोबर आत्या सुदधा उठून बसल्या. आम्हा दोघींमध्ये माझा सहा वर्षाचा' समर्थ 'अजून गाढ झोपेत होता. आत्यानी त्यांची सतरंजी घडी करून कोपऱ्याला अंथरली आणि मी समर्थला उचलून त्यावर झोपवलं. तोपर्यंत आत्यानी सारं अंथरूण घडी करून ठेवलं.

“ मनिषा, बाथरूमला जावून येते ग.... “

म्हणून त्या निघून गेल्या.

सोमवार असल्यानं मी डोक्यावरून पाणी घेतलं. घरातला फाटका टॉवेल केसांना गच्च आवळून कमरेला पदर खोपसला आणि कामाला सुरुवात केली.

बाथरूमला जाऊन आल्यावर आंघोळीला जाता जाता आत्यानी विचारलं.

" दुपारच्या कामाचं काय झालं गं……भेटलं का कुठं ? "

आत्याकडे थोड्याशा रागीट नजरेने बघितलं आणि त्या समजून गेल्या. शेवटची चपाती लाटून मी तव्यावर टाकली आणि एक नजर समर्थकडे बघितलं. तो उठून बसला होता. दरवाज्यात शाळेला जाणाऱ्या मुलांना बघितलं की त्याचं लक्ष खिळयाला अडकवलेल्या त्याच्या दप्तराकडे जायचं आणि मग त्याचं तोंड बारीक व्हायचं. आतल्या आत मला माझाच राग आला. दुपारचं काम सुटलं नसतं तर कशीतरी मी त्याची फी भरली असती पण ऐनवेळी दुष्काळात तेरावा महिना आल्यासारखं झालं होतं.

इंगरजी शाळेतून काढून मराठी शाळेत घालावं तर ह्यांना आवडलं नसतं. समर्थला इंगरजी शाळेत घालताना त्यांनी मला बजावलं होतं.

" तुला सांगून ठिवतो मने, काय भी झालं तरी आपण समर्थला इंगरजी शाळेतच शिकावायचं. मराठी शाळा शिकलेल्याना काय किमत नाय उरली आता………….. "

हयांच हे स्वप्न माझ्या डोक्यावर थयथय नाचत होतं. समर्थला सुदधा शाळेचा खूप नाद होता. अभ्यासात सुदधा तो हुशार होता. काहीही करून मला फी भरायचीच होती. आणि मी ठरवलं…..

सकाळची धुणी भांडी करण्यासाठी मी पटेल बाईच्या घरी जात होते. तशी ही बाई एक नंबरची कुंजूष होती तेंव्हा ही पैसे देईल असं काय वाटत नव्हतं. उलट असा काहीतरी शब्द बोलेल की माझाच अपमान होईल म्हणून मी तिच्याकडे

मागत नव्हते. पण आज मी तिला विचारून बघण्याच ठरवलं. काही मनाला लागल असं बोलली तर घिऊ ऐकून.

आवरता आवरता घड्याळाचे दोन्ही काटे सातवर आले. हुंबऱ्याबाहेर जाऊन मी माझी ओली केसं त्याच टॉवेलने झटकून घेतली. तरी सुदधा अजून ओलीच होती त्यामुळे एक क्लिप लावून मी त्यांना मागे मोकळं सोडलं. आरश्यासमोर येऊन एकवेळ स्वताचा चेहरा बघितला तर कपाळावरची काळी टिकली नेहमीच्या जागेवरून बाजूला सरकली होती. पहिल्यांदाच असं झालं होतं. सरकलेली टिकली काढून मी बोटावर नीट धरली आणि कपाळाच्या मध्यभागी लावली पण काही केल्या ती चिटकेना. आज या टिकलीला काय झालं ? लाज तर वाटत नसेल तिला माझ्या मोहक चेहऱ्याची, लांबसडक दाट काळया केसांची. आता कुठे बहरल होतं माझ्या तारुण्याचं फूल आणि त्या फुलावर चिटकायला काळा रंग सुदधा लाजत होता.

नवऱ्याने पाठीमागून येऊन माझ्या मानेवरच्या केसांना बाजूला सारून हलकेच माझ्या मानेवरती ओठ टेकवल्यासारखं झालं आणि गेल्या सहा महिन्यात मी स्वताला आरशात पहिल्यांदाच लाजत असताना बघितलं. ती टिकली मी फेकून दिली आणि आत जाऊन गॅस बंद असल्याची खात्री करून घेतली.

“ चल समर्था, मी निघते. आजी आली की सांग मी गेले म्हणून........ “

हुंबऱ्याबाहेर जाऊन पायात चप्पल चढवत मी समर्थला सांगितलं. पण तो पर्यन्त आत्या आल्या सुदधा. आतमध्ये जाता जाता त्या म्हणाल्या,

“ छत्री घेऊन जा की......... “

“ नको, येताना पाऊस नसला की विसरायला होतं......... “

पुढे आत्या अजून काहीतरी बोलणार होत्या की तेवढ्यात पाठीमागून सुधामावशीचा आवाज आला.

“ मनिषा थांब जरा......... काम हाय तुझ्याकडं..... “

पटापट चालत त्या माझ्याकडेच येत होत्या. पीठ लागलेल्या हातात त्यांनी त्यांचा मोबाइल धरला होता. आमच्या या गल्लीत एकूण सहा घरं होती त्यात सगळयात शेवटी सुधामावशीचं घर होतं. नुकतच त्यांनी त्यांचं घर दुमजली बांधून घेतलं होतं.

“ काय झालं मावशी ? “  मी विचारलं.

“ अग...... माझ्या बहिणीच्या गावावरून एक मुलगा आलाय....... ती काळी भाजीवाली आहे ना, तिथं उभारलाय....... जरा समर्थला घेऊन जा की तुझ्याबर आणि त्याच्याबर पाठवून देतीस का ? “

“ पाठवते, पण त्याला ओळखू कसं ? “

“ आनंद नाव हाय त्याचं..... आनंद पाटील...... लाल कलरचा शर्ट घातलाय म्हणं त्यानं. खांद्याला बॅग हाय त्याच्या, तवा ओळखशील तू त्याला....... “

आनंद नाव ऐकताच मला आतल्या आत बहरल्यासारखं झालं कारण माझ्या नवऱ्याच नाव सुदधा आनंदच होतं, अर्थात आहे.

आतमध्ये डोकावून मी समर्थला हाक मारली. समर्थ येत असताना मावशी आत्याला सांगत होत्या.

“ माझ्या बहिणीच्या गावच्या पाटलाचा मुलगा हाय. आमची वरची रूम त्यालाच दिलीय भाड्यानं......“

पुढे अजून बरच काही सांगत होत्या पण मी मात्र समर्थला घेऊन निघाले. आमच्या गल्लीतून मी रस्त्याकडे जाणाऱ्या गल्लीत आले. ही गल्ली खूपच

छोटी होती. एकाच वेळी जर दोन माणसांना जायचं असेल तर एकाला बाजूला सरकून उभारावं लागायचं नाहीतर एका अंगावर होऊन एकामेकाला जागा द्यावी लागायची.

पटापट चालत आम्ही दोघेही रस्त्यावर आलो. समोर मोकळं मैदान होतं जिथ लहान मुले खेळत होती. तिथेच मैदानाच्या अलीकडच्या बाजूला रस्त्याला लागून एक वडाचं मोठ्ठं झाड होतं आणि झाडाखाली माणसांना बसण्यासाठी एक कट्टा बांधला होता. त्या कट्ट्यावर नगरातली टपोरी पोरं गप्पा मारत बसली होती पण मला बघताच सारेजण माझ्याचकडे बघू लागले. माझ्या आयुष्यातलं सारं टेन्शन एकीकडे आणि हे टेन्शन एकीकडे. वासनेने भरलेले हे डोळे बघितले की माझ्या उरात धस्स करायचं.

सुरवातीला तर मी कामावर जायच्या वेळी दोघे तिघेजण मुद्दाम गल्लीमध्ये फिरकायचे. एखाद्या शेळीच्या पिल्लाला गिळण्यासाठी लांडगा जसा डोळे वटारून मोक्याचा शोध घेत असतो तसं ही पोरं माझ्या एकटेपणाचा फायदा घेण्यासाठी आसुसलेली होती. नंतर आत्यानी जाऊन गल्लीतल्या बायाना सांगितल्यावर सगळयांनी मिळून त्यांना चांगलाच दम भरला होता. तेंव्हापासून त्यांचं धाडस कमी झालं होतं.

माझं सुंदर दिसणंच एक दिवस माझं शत्रू बनेल असं कधी वाटलं नव्हतं. मी स्वताला आरशात इतकी सुंदर दिसते तर त्यांना ही दिसत असेलच की ? तसल्यात मला नवऱ्याची सवय झालेली. डोक्याखालच्या उशीला नवऱ्याची छाती समजून मी उगाच जमिनीवर झोप लागूपर्यन्त हात फिरवत पडून राहायची. मी सुदधा आतून तहानलेलीच होते. फक्त लपवण्याचा प्रयत्न करत होते. पण ज्या पुरूषांना माहीत होतं की माझा नवरा मेलेला आहे त्यांना माझी तहान लगेच कळायची. माझ्या याच परिस्थितीचा फायदा घेण्याचा प्रयत्न ही पोरं करू पाहत होती पण मी माझ्या पावित्र्यावर शिंतोंडे पडू देणार नव्हते. मला फक्त माझ्या लेकरासाठी जगायचं होतं.

त्या पोरांच्या नजरेकडे लक्ष न देता मी समर्थचा हात घट्ट पकडला आणि समोर बघत चालू लागले. समोर काळया भाजीवालीजवळ एक लाल शर्ट घातलेला मुलगा खांद्याला बॅग अडकवून उभा असलेला दिसला. हाच असावा कदाचित.

तो सुदधा कोणाला तरी शोधत होता. कदाचित सुधामावशीने त्याला न्यायला कोणीतरी येणार असल्याच सांगितलं असावं. आणि तो त्यालाच शोधत असावा. एवढ्या माणसात फक्त मलाच माहीत होतं की तो मलाच शोधतोय.

त्याची शोधक नजर अखेर माझ्यावर येवून पडली आणि तिथेच थांबली. शेवटी हा पण एक पुरुषच होता. तो इतक्या मोहक नजरेने माझ्याकडे बघत होता की त्याच्या नजरेतून नजर सोडवून घ्यायची ईच्छाच होईना. माझ्या रूपावर भाळलेले डोळे ते नक्कीच होते पण त्यात मला वासना दिसत नव्हती. गेल्या सहा महिन्यात अशी नजर मी पहिल्यांदाच बघत होते. अचानक त्यानेच नजर सोडवून घेतली. आणि मग मला कळालं की मी त्याच्या जवळ आले आहे. मी त्याच्या पुढे जाऊन विचारलं,

" तुम्हीच का – आनंद पाटील ? "

" व्हय व्हय मीच.......... " शॉक बसल्यासारखं त्याने उत्तर दिलं. मी मुददाम एकवेळ त्या टपोरी पोरांकडं बघितलं तर त्यांचा चेहरा कोणीतरी त्यांना कानाशीलात लगावल्यासारखा झाला होता.

नंतर समर्थकडे वळून मी त्याला म्हणाले,

" या दादाला सुधामावशीच घर दाखव. " त्याने होकारार्थी मान डोलावली तशी परत मी त्या मुलाला म्हणाली,

" हा घेऊन जाईल तुम्हाला............ "

समर्थच्या डोक्यावरून हात फिरवून मी सरळ पुढे बघून चालू लागले. दहा बारा पावले पुढे गेल्यानंतर मी मागे वळून बघितलं आणि बघतच राहिले.

तो मुलगा समर्थाचा हात पकडून त्याच्याबरोबर चालत होता. अधून मधून खाली वाकून त्याला काहीतरी विचारत होता. अचानक माझी नजर त्याने घट्ट पकडलेल्या हातावर गेली आणि मला आठवलं, त्याचे बाबा सुदधा असेच त्याचा हात घट्ट पकडून चालायचे आणि चालता चालता ते त्याच्याबरोबर काहींना काही बोलत असायचे.

त्याची ती नजर आणि घट्ट पकडलेला हात बघून लाजत लाजत मी पाठीवर मोकळी सोडलेली केसं छातीवर कधी घेतली माहीतच नाही पडलं. आणि परत वळून चालता चालता मी स्वतालाच एक प्रश्न विचारला.

“ मी त्याच्या प्रेमात पडल्यासारखं लाजावं की असा विचार माझ्या मनात आला म्हणून माझी मलाच लाज वाटावी ? “

मला माझीच लाज वाटली.

2)

पटेल बाईसमोर लाख विनवण्या केल्या पण तिला काय दयेचा पाझर फुटला नाही. संध्याकाळी ज्या खानावळीत मी चपात्या बनवायला जात होते तिथे सुदधा निराशाच पदरी पडली. सुधामावशी एक पर्याय होत्या पण त्यांच्या नवऱ्याकडे बघून त्यांना मागण्याचं धाडस होत नव्हतं. तिचा नवरा म्हणजे मोठा वासनाधारी नाग होता. येता जाता तो मला केसांपासून ते पार पायाच्या तळव्यापर्यंत काळ्या नजरेने बघायचा. त्याच्याकडून पैसे घेणे म्हणजे त्याला आयतं निमंत्रण दिल्यासारखंच होतं.

रात्री जेवण झाल्यावर झोपताना आत्या म्हणाल्या,

“ तुला त्या शिंदे मॅडम माहीत आहेत का ग...... ? त्या राम मंदिर जवळच्या. “

“ ओळख नाहीये पण कसलेतरी पैसे गोळा करत असतात ना ? “

“ अग...... त्यांची कंपनी म्हणं लोन देती....... “

मी एकदम उठून बसले. आत्या पुढे सांगत होत्या.

“ संध्याकाळी भेटले मी त्यांना....... सांगितली आपली अडचण....... तर हुईल म्हणली काम....... शाळेसाठी म्हणल्यावर व्याज भी कमी लागल म्हणली. “

मला आतल्या आत खूप बरं वाटलं. मी समर्थच्या डोक्यावरुन हात फिरवला त्याला झोप लागली होती.

“ मग कधी भेटतील पैसे ? “ मी मोठ्या उत्सुकतेने विचारलं.

“ उद्या घेऊन येती म्हणली तिच्या साहेबाला............ दोन तीन दिवस लागतात म्हणली - पैसे हातात यायला........ “

त्या दिवशी कितीतरी दिवसाने मी समाधानाने उशीवर डोके ठेवले. मनातल्या मनात मी आत्यांचे खूप आभार मानले. कितीतरी वेळ मी माझा भूतकाळ आठवत होते.

***

लग्न करून सासरी येताना माझ्या मैत्रिणी, आजूबाजूच्या बाया मला सांगत होत्या.

" हे बघ मनिषा, घरात सगळयांचा नखरा एकीकडं तर सासूबाईचा नखरा एकीकडं असतू. तवा तिला तेवढाच मान द्यायचा जेवढी तिची लायकी असती. उगाच तिला घाबरून राहायचं नाय. "

लग्न झालं तेंव्हा नुकतच सोळावं वरिष सरलं होतं. लवकर लग्न व्हायचं कारण असं होतं की बाबा वारल्यानंतर घरात दादा आणि वहिनीचा धाक सुरू झाला होता. कसतरी करून मला हळद लागावी म्हणून आई जाईल तिकडे माझ्या लग्नाचा विषय काढू लागली होती. दोघेजण बघून गेले होते पण हुंड्यात जास्त पैसे मागितल्यामुळे काय जमलं नव्हतं. तसल्यात एक दिवस आनंदराव बघायला आले. माझ्यापेक्षा दहा बारा वर्षाने मोठे.

मला नवरा म्हणून माझ्यापेक्षा दोन एक वर्षाने मोठा आणि अंगापिंडाने भरलेला तरुण मुलगा हवा होता पण आनंदराव तरुण वाटत नव्हते. आता ते मला आवडले की नाही या प्रश्नाला काहीच किंमत नव्हती. त्यांना मात्र मी आवडले होते. आवडत नसताना सुदधा लग्न करावं लागत होतं म्हणून आईला म्हणाले,

" आई मला नाय आवडले.......... आनंदराव... "

आई एकदम घाबरलीच. मला बाजूला घेऊन जाऊन तिने समजावून सांगितलं.

" नीट लक्ष दिऊन ऐक मने, जरा वयानं मोठा वाटतुय पोरगा पण चांगला हाय त्यो. मला हुंडा म्हणून एक रुपयाभी नको असं चार माणसात म्हणाला. मुंबईला नोकरीला हाय. तिकडं एक घरभी घेतलय त्यानं, त्ये भी सोताच्या जीवावर. तुला लय खुश ठेवलं बघ त्यो. जमीन जरा कमी हाय पण काडीचं भी व्यसन नाय त्याला. त्याला एक मोठा भाऊ हाय त्यो बायकापोराबर गावालाच असतो. बा वारलाय त्याचा, एकलीच सासू हाय. तिघाचा तर स्वयपाक करायचाय तुला.................................. " एवढं सांगून आई थोडीशी थांबली आणि डोळयात पाणी आणत पुढं म्हणाली,

" उद्या मला काय झालं तर, तुला आंधळया- लंगड्याच्या गळयात बांधायाला सुदधा कमी करणार नाय तुझा हयो भाऊ. तुझ्या अंगाला एकदा हळद लागली की माझा जीव जायला मोकळा.................... तसं भी तू अन मी , या घराला ओझच झालूया...... " आणि मग अचानक रडूच लागली.

रूपाने जरी आवडले नसले तरी त्यांचा आईने सांगितलेला स्वभाव मला आवडला होता. आणि मग एक दिवस मुहर्त बघून आमच्या डोक्यावर अक्षता पडल्या.

आत्याबाई वाटलं तितक्या वाईट नव्हत्या पण आई इतक्या चांगल्या ही नव्हत्या. पण पुढे आई वारल्यावर त्यांनी खूप सांभाळून घेतलं मला. लग्नाला चार पाच महीने झाले असतील की मला दिवस गेले त्यावेळी तर त्यांनी खूप लाड केले माझे. आईची आठवण ही येऊ दिली नाही.

आज मात्र मला फक्त त्यांचाच आधार होता. रात्री उठून मी त्यांचे पाय धरले आणि पुन्हा एकदा आभार मानले.

दुसऱ्या दिवशी शिंदे मॅडम त्यांच्या साहेबांना घेऊन आल्या. सगळं काही समजावून सांगितलं आणि कागदांवर सह्या घेऊन निघून गेल्या. जाताना म्हणल्या,

“ शुक्रवारी नायतर शनिवारी आणून देती पैसे....................... “

चार हजाराची गरज होती पण लोन पाच हजार मिळणार होतं. विचार केला- वरच्या पैशातून समर्थसाठी नवीन कपडे घेईन आणि आत्यांसाठी एखादी साडी पण घेईन.

त्यादिवशी मी खूप खुश होते. खानवळीतल्या बाया म्हणत होत्या.

“ मनिषाला काय झालय? पटापट चपात्या लाटतीय आज....... “

खानावळीतून परत येताना संध्याकाळ झाली होती. हलकासा अंधार पडला होता. मी आपली इकडं तिकडं लक्ष न देता पटापट चालत गल्लीत शिरले तर समोरून तो मुलगा येत असताना दिसला. त्याला बघताच अंगात एक वेगळीच लहर आली. एव्हाना समोरून जर एखादा पुरुष माणूस येत असेल तर मी स्वताहून बाजूला सरकून त्याला जागा देत असे पण आज मी तशीच पुढे गेले.

पहिल्यांदाच धाडस केल्यामुळे एक मन घाबरत होतं तर दुसरं मन म्हणत होतं,

“ अजून किती दिवस अशी घाबरत जगणार आहेस ? त्याचा स्पर्श झाल्यानं तुझं पावित्र्य काय कमी नाय होणार. आणि कोणासाठी जपून ठेवतेस हे पावित्र्य ? मेलेल्या माणसासाठी ? “

हा विचार मनात आला आणि मी जागच्या जागीच थांबले. मला असं अचानक थांबलेलं बघून तो पळतच माझ्याकडे आला आणि म्हणाला,

“ बरं हाय ना तुम्ही ? “

त्याच्याकडे न बघता मी तशीच पुढे निघून गेले. मला स्पर्श करण्यासाठी उचलेला हात त्याने परत मागे घेतलेला मी पाहिला होता. या मुलाला बघितल्यावर मला असं का होतय हेच कळत नव्हतं.

मी रात्रभर नवऱ्याच्या फोटोकडे बघून त्यांची क्षमा मागत होते. डोळयातल्या पाण्याने डोक्याखालची उशी भिजली तरी डोळयातलं पाणी काय थांबत नव्हतं.

किती काळजी घ्यायचे ते माझी. त्यांच्या छातीवर डोकं ठेवून मी किती शांतपणे झोपायचे. कितीतरी वेळा ते म्हणाले होते.

“ तू माझ्या या छोट्याशा राजवाड्याची राणी आहेस. तू फक्त साथ दे मग बघ तुझा हा राजा तुझ्यासाठी काय काय करतो ते................. “

नवऱ्याच हे वाक्य आठवलं आणि मी डोळयातलं पाणी पुसत समर्थकडे कूस बदलली.

समर्थच्या जन्माच्यावेळी तर किती लाड केले होते ह्यांनी माझे. मोठ्या हिमतीने त्यांनी समर्थला इंगरजी शाळेत घातलं होतं. असंच एक दिवस मी त्याना म्हणाले होते,

“ मी पण बघू का कुठेतरी काम, शाळा लय नाय झाली माझी पण धुणीभांड्याची कामं मिळतील मला. तेवढेच चार पैसे अजून येतील घरात. “

त्यावर ते रागावून म्हणाले होते.

“ माझ्या राणीनं दुसऱ्याच्या घरची भांडी घासलेली चालणार नाय मला. वेळ पडली ना तर मी रात्रभर थांबून काम करेन. “

मी कूस बदलून परत त्यांच्या फोटोकडे बघितलं आणि त्यांना सांगितलं.

“ तुमची राणी आता दुसऱ्यांच्या घरची भांडी घासूनच घर चालवतेय. “

***

समर्थ पहिलीला असताना दिवाळीची सुट्टी संपल्यावर संध्याकाळच्या वेळेस एक हवालदार आमच्या घरी आला. आणि दारावर येऊन म्हणाला,

" आनंद मानेचं घर हेच का ?"

" व्हयं, काय झालं ? " आत्या उठून दारावर गेल्या.

" तुम्ही कोण त्यांचे ? "

" मी आय हाय त्याची........ "

" तुम्ही सगळयांनी चला आमच्याबरोबर................... "

" कुठे ? "

" चला अगोदर, सांगतो वाटेत............ "

अचानक वादळ आल्यासारखं हा हवालदार आला होता. खूप विनवणी केली पण त्याने काही सांगितलं नाही. शेवटी तो आम्हाला एका दवाखान्यात घेऊन गेला.

समोर माझ्या नवऱ्याला पांढऱ्या कपड्यात गुंडाळून ठेवलं होतं. डोळे मिटलेले होते. श्वास बंद पडला होता. कोणीतरी काळजावर कुऱ्हाडीचा जोरात घाव घालावा असं झालं होतं. पाठीमागून त्या हवालदारचा आवाज येत होता.

" चालत्या बस मधून उतरताना अचानक पाय घसरला आणि कंबर धरून खालचा भाग चाकाखाली आला. माणसांनी गडबडीत आणलं इथं पण वाटेतच जीव सोडला त्यानं. "

मी सुदधा त्यांच्या बरोबर निघून गेले होते. अंगातला प्राण त्यागला होता. जीव जावून कोसळणारच होते की समर्थने पायाला गच्च मिठठीच मारली. शेवटी समर्थसाठी थांबव लागलं.

दादा-वाहिनी, दीर-भावजं, नातेवाईक सगळे सांत्वन करून निघून गेले. जाताना दादा म्हणाला,

" चल चार दिवस........... माहेरी ? "

त्याच्या चल म्हणण्याचा आधार वाटला पण चार दिवस खटकले. कारण प्रश्न चार दिवसाचा नव्हता तर पुढे वाढून ठेवलेल्या आभाळयाएवढ्या आयुष्याचा होता.

सगळे निघून गेल्यावर आत्या माझ्या जवळ आल्या आणि म्हणल्या,

" सारी दुनिया तुला सोडून गेली असली तरी....... तुझी आत्या, तुझी आई अजून जीवंत हाय..... तुला सोडून ती कुठच जाणार नाय. "

त्या दिवशी मी शेवटचं मन भरून रडले होते. आत्याचा पदर, त्याखालचा ब्लाऊझ माझ्या आसवानी भिजून गेला होता पण त्यांनी माझ्या डोक्यावर ठेवलेला हात काढला नाही.

त्या दिवशी मला कळालं – संसार म्हणजे एक बैलगाडी असते. आणि नवरा बायको म्हणजे त्या गाडीची चाकं. माझ्या गाडीचं एक चाक निखळून पडलं होतं. संपलं होतं. पण आत्यानी पलिकडची बाजू उचलून धरली होती. आता मला माझ्या बाजूचा भार झेलत जिवाच्या ताकदीने गाडा पुढे ढकलायचा होता.

आता पर्यन्त ढकलत होते पण एकटीने होत नव्हतं.

3)

रात्र नवऱ्याच्या आठवणीत गेली. सकाळी उठले तेंव्हा माझ्या आणि आत्या बरोबर समर्थ ही उठला. त्याला काय झालं होतं कुणास ठाऊक ? आज त्याने माझ्यानंतर स्वताहून आंघोळ केली. आंघोळ करून बाहेर आल्यावर टॉवेलने अंग पुसून त्याने आतले कपडे घातले. खुंटीला अडकवलेलं दफ्तर खाली घेतलं. कदाचित त्याने ते रात्रीच नीट भरून ठेवलं होतं. त्याची ती शाळेला जाण्याची हौस बघून मी खूप सुखावले. त्याच्या जवळ जाऊन म्हणाले,

“ बाळा, अजून फी नाय भरली शाळेची. दोन दिवसात येतील पैसे, पैसे आले की आपण लगेच भरू. मग घेतील तुला शाळेत. “

“फी भरली कालच............. “ दफ्तर बंद करून बाजूला ठेवत तो म्हणाला.

मला एकदम धक्का बसल्यासारखं झालं.

“ कुणी भरली फी........... ?”

“ त्या माळयावरच्या दादांनी........ “ पहिल्यांदा माझ्या डोळयाला डोळा भिडवून त्याने उत्तर दिलं. काहीतरी अभद्र ऐकल्यासारखं झालं मला.

“ कुणाला विचारून घेतलेस तू त्याच्याकडून पैसे ?” मी त्याला दम भरला. माझ्या दम देण्याने तो एकदम घाबरून गेला. मी त्याला दम भरत होते आणि तो नुसताच खाली बघत होता. मला तर माझ्या अभिमानावर बलात्कार झाल्यासारखा वाटत होता. आणि रागाच्या भरात मी त्याच्या कानाखालीच लगावली.

माझ्या मारण्याने तो खालीच पडला. आणि जोरजोरात रडू लागला. आत्यानी येवून त्याला छातीशी धरलं. मी मात्र आतून तुटून पडले होते. पहिल्यांदा मी

एका पुरुषावर विश्वास ठेवण्याचा विचार करत होते पण तो सुदधा तसलाच निघाला. समर्थला चॉकलेट चारून माझ्याशी जवळीक करू पाहणाऱ्या पासून मी अगोदरच वैतागलेली होती तसल्यात याने तर चक्क चार हजार भरले होते. सुधामावशीला सांगून त्याला जाब विचारण्यासाठी मी रागातच घराबाहेर पडले.

सुधामावशीच्या घराला कडी लावलेली होती आणि वरच्या माळयावरच्या खोलीतून जोरात एक गाणं वाजल्याचा आवाज येत होता. मी तशीच वर चढले. जशी जशी मी पायरी चढत होते तसातसा गाण्याचा आवाज मोठा येत होता. शेवटची पायरी चढली आणि बघितलं तर त्याचं दार उघडं होतं. मी तशीच त्याच्या दारावर गेली आणि आतलं ते दृश्य पाहून माझा रागच मावळला.

दरवाज्याच्या समोर असलेल्या टी व्ही वर ते गाणं वाजत होतं आणि त्या टी व्हीत बघून तो मग्न होऊन नाचत होता. त्याचे डोळे समोरच्या भिंतीकडे असल्यामुळे त्याला मी आल्याची जाणीवच झाली नाही. त्याचा शर्ट खुंटीला अडकवलेला होता आणि अंगातलं बनियान त्याने काढून बाजूला फेकलं होतं. तालमितल्या पहिलवानासारखी त्याची पाठ होती. मजबूत बांधा आणि पिळदार पाठ बघून मी आपसूकच लाजले. गालावर केसं आली नसताना सुदधा मी त्यांना लाजून कानामागे घेतलं. नवऱ्यानंतर पहिल्यांदाच मी एका पुरुषाच उघडं शरीर बघत होते.

माझी पावले आपोआप आत जात असल्यासारखी मला जाणवली. चालत चालत मी त्याच्या जवळ गेले. त्याच्या पाठीमागे जाऊन मी माझे नाजुक हात त्याच्या पाठीवर ठेवले. तसा तो घाबरून पाठीमागे वळला आणि मी सुदधा घाबरून भानावर आले. तो अजून तसाच नाचत होता. आणि मी दरवाज्यात उभी होते. जे काही बघितलं होतं ते माझ्यातल्या आसुसलेल्या मनाने मला दाखवलं होतं.

मी घाबरून दोन पायऱ्या उतरून खाली आले. कपाळावरचा घाम पदराने पुसला. मी आत न गेल्याचं मला समाधान वाटलं. पण छातीमध्ये हृदयाची धडधड वाढलेली मला जाणवत होती. मी तशीच खाली आले. सुधामावशीच्या घराला अजून कडीच होती. मी झपाझप पावले उचलत घरी आले.

दुपारी पटेल बाईंच्या घरचं काम करून आल्यावर मी सुधामावशीकडे गेले आणि त्यांना फी भरल्याच सांगून टाकलं. त्याना सुदधा राग आला आणि त्यांनी त्याला खाली बोलावून घेतलं.

दरवाज्यातून आत आल्या आल्या मावशीने त्याला विचारलं.

“ तू हिच्या पोराची फी भरली ? “ त्याने एक नजर माझ्याकडे बघितलं.

“ हो भरली, त्यात काय एवढं ? “ तो एकदम सहजपणे बोलून गेला.

“ कोणाला विचारून भरलीस ? “

“ माझ्यातल्या विद्यार्थ्याला................. “

मी आणि मावशी दोघी ही एकमेकाकडे बघू लागलो. आम्हाला कळलच नाही. तो पुढे बोलत होता.

“ तो जसा एका शाळेचा विद्यार्थी हाय तसा मी सुदधा एका कॉलेजचा विद्यार्थी हाय. तो बिचारा गेली पंधरा दिवस शाळेला गेला नाय. पंधरा दिवस शाळेला नाय गेलं तर पुढं पंधरा दिवस मास्तर काय शिकवतात हेच कळत नाय. एकीकडं मुलांना जबरदस्ती शाळेला पाठवावं लागतं आणि इकडं समर्थला शाळेला जायचंय तर त्याला जायला मिळत नाय. आतल्या आत तुटला होता तो म्हणून मला राहवलं नाय. तसभी माझ्याकडं अप्पानी दिलेले पाच हजार होते. म्हणलं टाकुया भरून, माझी फी अजून पुढच्या महिन्याच्या शेवटी भरायचीय. “

मी फक्त ऐकत होते. माझ्या नवऱ्याच आणि याचं नाव सारखं होतंच पण आणखी एक गोष्ट सारखी सापडली ती म्हणजे शिक्षणासाठी असलेली काळजी.

“ पण बाबा, हे गाव नाही मुंबई हाय. इथ लोकं काहीही अर्थ काढतात. तसल्यात नवरा वारलेली बाई ही......... “ सुधामावशी एक नजर माझ्याकडे बघत म्हणाल्या.

यावेळी मात्र त्याने वेगळयाच नजरेने माझ्याकडे बघितलं. मी सुदधा त्याच्या नजरेला नजर दिली. माझे डोळे भरून आले होते आणि माझ्या भरून आलेल्या डोळयांना बघून तो उदास झाल्यासारखा वाटला.

" सॉरी बरं का, मला कळून नाय आलं. मला वाटलं – समर्थ सांगेल त्यांना, मग आले पैसे की देतील परत. पण खरंच सॉरी. परत नाय करणार मी असं. "

" ठीक हाय जा........... "

जाता जाता त्याने परत माझ्यावरून नजर फिरवली. मी अजूनही त्याच्या पाठमोऱ्या शरीरकडेच बघत होते. तो जे काही बोलला ते खरं होतं की माझ्या मनात जागा मिळवण्यासाठी तो खोटं बोलत होता. हाच प्रश्न मला सतावत होता.

तो गेल्यावर मावशी मला समजावू लागल्या.

" अग गावची माणसं आहेत ती, त्यांना नाय माहीत इथ माणसं कसा विचार करतात ते. उगाच नको आणूस शंका मनात. आले पैसे की दे माझ्याकडे, मी देईन त्याला. "

मावशीच्या घरातून बाहेर आल्यावर मी परत वळून बघितलं तर मावशी आतमध्ये गेल्या होत्या. त्या नसलेल्या पाहून मी वर पाहिलं तर तो गॅलरीत उभा राहून माझ्याकडेच बघत होता. मी लगेच खाली बघितलं आणि थेट घराकडे सुटले. घरात आल्याबरोबर मी नवऱ्याचा फोटो समोरच्या भिंतीवरून काढून बाजूच्या भिंतीवर लावला.

मी असं का केलं हा प्रश्न मला त्यावेळी पडला होता पण याच उत्तर शोधण्याची मला ईच्छाच नाही झाली.

4)

बरं झालं, मी नवऱ्याचा फोटो समोरून काढून बाजूच्या भिंतीवर लावला. त्यांच्या नजरेला नजर देण्याचं धाडसच होत नव्हतं. मी स्वताला सहा सात वर्ष मागे घेऊन गेले होते. मला असाच नवरा हवा होता. हा तर माझ्याच वयाचा असल्यासारखा दिसत होता.

त्याच्यावर विश्वास ठेवायला माझं मन आतुर झालं होतं. आरशात बघताना पाठीमागे तो उभा असल्यासारखं वाटायचं. रात्री झोपताना माझ्या बाजूला झोपून माझ्याकडे एकटक बघत असल्यासारखं भासायचं. कितीतरी वेळा माझे हात अलगद त्याच्या दिशेने जायचे आणि जमिनीवर पडल्यावर भानावर यायचे. आणि मग त्या रात्रीच्या अंधारात मी स्वतावर हसून लाजायचे. माझं वय आणि मनातल्या अतृप्त ईच्छेसमोर माझं पतिव्रता मन मागं राहिलं होतं. मला कळत होतं की मी त्याच्या प्रेमात पडलेय. आतल्या आत मी स्वताला समजावलं होतं.

" नवरा जिवंत असताना जर मी असा विचार केला असता तर नक्कीच मी चुकीची ठरली असती पण आता नवरा नाहीये. या एकटं जगण्याचा त्रास होतोय मला. गरज आहे मला जोडीदाराची. माझ्या संसाराच्या तुटून पडलेल्या चाकाकडच्या बाजूला नुसतच उचलून न धरता, माझ्यापेक्षा ही जास्त ताकदीने ढकलणाऱ्याची. आणि फक्त मलाच का ? समर्थला ही हवा होता एक बाप, ज्याच्या खांद्यावर बसून त्याला जग बघायचं होतं. एक मात्र नक्की आहे – माझं त्याच्यावर प्रेम जडलय. पण तो करतो का प्रेम माझ्यावर ? "

याचं उत्तर मला दुसऱ्याच दिवशी भेटलं.

सकाळी सात सव्वासातच्या सुमारास आत्या समर्थला शाळेला सोडायला गेल्या होत्या. मी न्हाणीतली धुवायची कापडे बाहेर आणून ठेवली. आत जाऊन बसण्यासाठी पाट आणून हुंबऱ्यावर ठेवला. अलीकडे मला सतत आरशात बघण्याचा नाद लागला होता. यावेळी परत मी आरश्यासमोर गेले. बांधलेला अंबाडा सोडला. उघड्या केसांवरून पदर घेऊन कमरेला खोचला आणि पाटावर बसून कपडे धुवायला सुरुवात केली. कपडे धूत असताना प्रत्येक वेळी माझं लक्ष त्याच्या घराच्या पायऱ्यांकडे जायचं. कदाचित मी त्याची वाट पाहत होती. माझ्या अंतरमनाने मारलेली शांत हाक जणूकाही त्याने ऐकली आणि तो खाली उतरत असताना दिसला. दोन तीन पावले चालत चालत तो माझ्याचकडे बघत होता आणि मी सुदधा लाज विसरून त्यालाच बघत होते. बघता बघता त्याने प्रेमळ अशी गोड स्माईल दिली. मी लाजून एकवेळ खाली बघितलं आणि परत त्याच्या डोळयाला डोळा देऊन मी ही एक स्माईल दिली. आता मात्र तो लाजला. लाजता लाजता त्याने त्याचा हात त्याच्या केसांवरून फिरवला आणि मी कपडे धुवायचं विसरूनच गेले. माझ्या बाजूने पाठीमागे जाउपर्यंत आम्ही दोघे एकमेकांकडेच बघत होतो. तो पाठीमागे गेल्यावर मी सुद्धा बसल्या ठिकाणी पाठीमागे वळले आणि थोडसं पुढं जाऊन त्याने डावा डोळा मारून मला प्रपोज मारला.

मी तर लाजून पाणी पाणी झाले. त्याने त्याच्या मनातली भावना मोकळी केली होती आणि आता माझी वेळ होती. मी परत वर बघून त्याला डोळा मारणारच होते की तेवढ्यात त्याच्या पाठीमागून आत्या येत असताना दिसल्या आणि मी घाबरून परत कपडे धुवायला सुरुवात केली. अंगात एक वेगळाच चंचलपणा आला होता. जोरजोरात कपड्यावर ब्रश घासताना मला माझ्या गळयात मंगळसूत्र लटकत असताना दिसलं. ते कधी माझ्या ओठांवर आदळायचं तर कधी छातीवर.

पहिल्या दिवशी होकार द्यायचा राहून गेला होता पण दुसऱ्या दिवशी मी स्वताहूनच डोळा मारला आणि आमची प्रेमकहाणी सुरू झाली.

येता जाता निसंकोचपणे नजरेला नजर भिडू लागली. मी कामावरून यायच्या वेळेला तो गल्लीमध्ये फिरकू लागला. छोट्याशा गल्लीतून जाताना हाताला

हात घासू लागले. अधून मधून मागे पुढे कोणी नसल्याचं बघून तो माझा हात पकडू लागला आणि कोणी दिसलं की हळूच हाताची बोटं दाबून सोडून द्यायचा. दुपारी तो कॉलेजवरून यायच्यावेळी मी सुद्धा दरवाज्यात बसून त्याची वाट बघू लागली. त्याच्यासाठी तर मी पार्लरमध्ये जाऊन अब्रो पण करून घेतला.

सुंदर असण्यापेक्षा कोणासाठी तरी सुंदर दिसण्याचा प्रयत्न करण्यात एक वेगळच सुख आणि समाधान असतं. ते त्या दिवशी मला जाणवलं.

एका संध्याकाळी मी काहीतरी कामानिमित्त बाहेर आले तर तो त्याच्या गॅलरीत उभा राहून माझ्याकडेच बघत होता. मला बघताच त्याने माझ्याकडे हवेत चुंबन सोडलं. आजूबाजूला कोणी नसल्याचं बघून मी सुद्धा ते झेललं आणि आत जाऊन मी एकवेळ डोळे भरून ते चुंबन पाहिलं आणि मनात साठवून ठेवलं. पण आता यावर समाधान होत नव्हतं. असं वाटायचं की भान हरपल्यासारखं पळत सुटावं आणि घरचा हुंबरा ओलांडून, त्याच्या घरच्या पायऱ्या चढून त्याला गच्च मिठ्ठी मारावी आणि करून टाकावं सारं काही त्याच्या स्वाधीन. कदाचित त्याच्या ही मनात असच काही चालू असावं. पण पुढचं पाऊल उचलण्याच धाडस ना मी करत होते ना तो करत होता.

धाडस आपोआप झालं असतं पण आत्यानी अचानक आमच्या प्रेमाच्या सुसाट सुटलेल्या गाडीला ओढून धरलं. अलीकडे समर्थला सोडून त्या लगेचच येऊ लागल्या आणि आल्या की दरवाज्यातच बसायच्या. पहिल्यांदा ज्या दिवशी त्या दरवाज्यात बसल्या त्याच दिवशी त्यांनी मला बजावलं.

“ आजपासून आतमध्ये न्हाणीत कपडे धूत जा........ घरासमोर ओलं झालेलं नाय आवडत मला.... “

मी गपचूप आत गेले. मला कळलं होतं की आत्याना माझ्यावर संशय आला आहे पण त्या सरळ माझ्याशी या विषयावर बोलत का नव्हत्या? त्यांनी एकवेळ मला खरंखरं विचारून दम भरला असता आणि त्याच्यापासून दूर होण्याची सक्ती केली असती तर कदाचित मी आणखीन त्याच्या जवळ गेले असते पण आत्या असं

काहीच करत नव्हत्या. आतातर त्या मुद्दाम मी यायच्या वेळेला भाजीवाली जवळ उभा राहायच्या आणि माझ्या सोबत घरी यायच्या. अलीकडे त्यांचं हुंबऱ्यावर बसणं पण खूप वाढलं होतं.

आमच्या या प्रेमकहाणीत थोडं का होईना पण विरहाचं दुख आलं होतं. आणि या विरहाच्या दुखात तो दिवस उगवला.

त्या दिवशी रविवार होता. मी खानवळीला निघण्याच्या गडबडीत होते तेंव्हाच समर्थ आला आणि म्हणाला,

" आई आज रात्री माझ्यासाठी जेवण नको बनवू.... "

" का रे ? "

" तो माळ्यावरचा दादा आहे ना त्याचा बर्थडे आहे आज. तर तो गल्लीतल्या सगळया मुलांसाठी चिकन बिर्याणी आणणार आहे. केक पण आणणार आहे तो.................... "

माझ्या ओठांवर हलकच हसू तरळून गेलं.

रात्री खांनावळीतून घरी यायच्या ऐवजी मी बाजारात गेले. त्याच्यासाठी काहीतरी गिफ्ट घेण्याची ईच्छा अस्वस्थ करत होती. पाकीट काढून बघितलं तर फक्त चारशे वीस रुपये होते. म्हंटलं, दोनशे तीनशे पर्यन्त घेऊ काहीतरी. काय घ्यायचं हा एक मोठा प्रश्न होता. अस काहीतरी घ्यायचं होतं जे प्रेमाचं प्रतीक ही असेल आणि त्याला आवडेल ही. एक छोटाशा ताजमहल बघितला पण दुकानदार काही पाचशेच्या खाली उतरायला तयार नव्हता. शेवटी निराश मनाने बाहेर आले.

विचार करत चालत असताना अचानक माझी नजर एका कपड्याच्या दुकानाबाहेर उभा केलेल्या एका मुलाच्या पुतळयावर गेली. त्याने लाल रंगाचा खूप

मस्त टी-शर्ट घातला होता. त्या टी-शर्टच्या छातीवर इंगरजीची चार अक्षरं मोठ्या लिपीत लिहिली होती.

L O V E

याला मराठीमध्ये प्रेम असं म्हणतात हे मला ठाऊक होतं. मनोमन मी तो टी-शर्ट घेण्याचा निश्चित केलं आणि आतमध्ये शिरले. हा दुकानदार पण काही केल्या पाचशेच्या खाली उतरायला तयार नव्हता. मी शेवटचं म्हणाले,

“ माझ्याकडं फक्त चारशेच हायेत, तेवढ्यात देणार का ? “

“ तुम्हाला नाय घ्यायचं तर सोडा मॅडम, चारशेत नाय परवडणार. “ त्याने मला दाखवायला काढलेला टी-शर्ट परत ठेवायला सुरुवात केली आणि हताश होऊन मी बाहेर जाऊ लागले. वाटत होतं की मला बाहेर जाताना बघून हा शेवटी मला हाक मारेल आणि चारशे मध्ये देऊन टाकेल पण त्याने काही हाक नाही मारली आणि मी बाहेर आले. डोळे भरून त्या टी-शर्टला बघून घेतलं. त्या पुतळ्याच्या जागी मला साक्षात तोच उभा असल्यासारखा वाटला आणि मग मला राहवल नाही.

दरवाजा उघडून आतमध्ये डोकावत मी परत दुकानदाराला विनंती केली.

“ चारशे वीस रुपये देती, द्याना प्लीज......... “

“ ठीक आहे या ....................... “

तो असं बोलला आणि मी ताडकन आत गेले. एका चांगल्या पेपरात त्यांनी मला टी-शर्ट गिफ्टरॅप करून दिला. मी न राहवून माझा मोबाइल नंबर एका कागदावर लिहून तो कागद आतमध्ये टाकला.

हवं असलेलं गिफ्ट घेतल्यामुळे माझ्या अंगावर मूठभर मांस जास्त चढलं होतं. तसल्यात रिकाम्या झालेल्या पाकीटाचा ही मला विसर पडला होता. गिफ्ट घेतलं होतं खरं पण हे आत्यापासून लपवायचं कसं ? आणि ते त्याच्यापर्यंत पोह्चवायचं कसं ? हे दोन प्रश्न अजून सुटायचे बाकी होते. घराजवळ पोह्चले आणि दारावर आत्यांची चप्पल बघून आणखीनच टेन्शन आलं. मी पटकन ते गिफ्ट कंबरेला खोचलं आणि त्यावरून पदर घेतला. हळूच आत जात होते की आत्यानी विचारलं.

“ आज एवढा उशीर कसा काय झाला ग........ ? “

“ ते जरा काम वाढलं होतं खानावळीत....... “ बोलता बोलता मी आतल्या खोलीत गेले. आणि एकवेळ बाहेरच्या खोलीत डोकावून बघितलं तर आत्या अजून बसलेल्याच होत्या. मी हळूच ते काढून मोठ्या डब्यात ठेवलं. आणि बाहेर येऊन आत्याना विचारलं.

“ समर्थ कुठे गेलाय ? “

“ त्या माळयावरच्या पोराचा बथडे नाय का ? तिथच गेलाय. “

रात्री मी आणि आत्या एकत्र बसून जेवलो. जेवण झाल्यावर आत्या बाथरूमला जातो म्हणून बाहेर गेल्या आणि मी बाहेर येऊन माळयाकडे बघितलं तर समर्थ आणि त्याच्याबरोबर चार पाच लहान मुले खाली उतरत होती. आत्या यायच्या आत मला समर्थकडून ते गिफ्ट त्याच्यापर्यंत पोह्चवायचं होतं. समर्थ आला तो हातात केक आणि वेफरची प्लेट घेऊन. आणि मला म्हणाला,

“ दादांनी तुझ्यासाठी दिलय. “

त्याच्या डोक्यावरून हात फिरवत मी एक केकचा तुकडा त्याला अर्धा भरवला आणि मी अर्धा खाल्ला. खाता खाता मी त्याला विचारलं.

“ त्याला गिफ्ट काय दिलस तू ? “

“ काही नाही ...... “

मी लगबगीनं आत जाऊन ते गिफ्ट आणलं आणि त्याच्या हातात देत म्हणाली,

“ त्याला म्हणावं, तुझ्याकडून हाय हे गिफ्ट. आणि लपवून घेऊन जा. कुणाला कळलं नाय पायजे. अंधारात कोणी बघितलं तर हिसकावून घेतील. “

तो खुश होऊन पळतच गेला.

त्याच्या वाढदिवसाचा केक खाल्यामुळे, मनासारखं गिफ्ट मिळाल्यामुळे आणि ते त्याच्यापर्यन्त पोहचवल्यामुळे मन खूप समाधानी होतं. त्यामुळे रात्री लगेच झोप लागली.

झोप लागल्यावर अचानक फोन वाजू लागला. मी घाबरून उठले. ऊशाला ठेवलेला मोबाइल घेऊन बघितला तर नवीन नंबर होता. उचलणारच होते की तेवढ्यात आत्यांचा आवाज आला.

“ कुणाचा फोन आलाय ग.......... त्ये भी एवढ्या रात्री ? “

घाबरून मी पटकन फोन कट केला आणि म्हणाली,

“ कंपनीवाल्यांचा हाय....... हे गाणं घ्या, ते गाणं घ्या म्हणत बसत्यात... “

बोलता बोलता मी फोन सायलन्ट वर ठेवला. नवीन नंबर असल्यानं त्याचाच फोन असल्याची शक्यता होती. बऱ्याच वेळा त्याचा फोन येऊन गेला पण

आत्या जागीच असणार हे मला पक्क माहीत होतं त्यामुळं मी उचलला नाही. शेवटी त्याला राग येईल म्हणून मीच फोन लावून कानाला लावला. पहिली रिंग पुर्णपणे वाजायच्या अगोदर त्याने फोन उचलला आणि एका दमात बोलून गेला.

" आय लव्ह यू मनिषा.........................."

मी लाजून फोन कट केला आणि छातीशी कवटाळून धरला. पहिल्यांदा कोणीतरी आय लव्ह यू बोललं होतं. मन पाखरू होऊन नुसतच उडत होतं. कितीतरी वेळ मी त्याच्याच स्वप्नात रंगलेली होते.

अखेर जेंव्हा छातीवरून मोबाइल काढून बघितला तर त्याचे चौदा मिस्डकॉल आले होते. मी त्याला एक मेसेज केला.

" आत्या जाग्या आहेत. फोन नाही उचलू शकत. सकाळी मिस्सकॉल देईन. "

तिकडून एक मेसेज आला.

" उद्या संध्याकाळी तू, मी आणि समर्थ फिरायला जाणार आहोत. चार वाजता नाक्यावरच्या ब्रिजखाली मी तुझी वाट बघेन. आलीस तर मी समजेन की तुझं ही माझ्यावर प्रेम आहे आणि नाही आलीस तर माहीत नाही मी काय करेन. "

त्याने फक्त मला बोलावलं असतं तर मी एकवेळ विचार केला असता पण त्याने समर्थला सुद्धा बरोबर घेतल्यानं मी जाण्याचं नक्की केलं आणि झोपी गेले.

5)

रोजच्याप्रमाणे आज सुदधा पहाटेच डोळे उघडले. घरावरचे पत्रे आज नुसतेच पांढरे दिसत नव्हते तर चमकत होते. आनंदी मनाने अंगावरचं पांघरून काढून उठून बसले आणि बघते तर काय ?

समोर माझ्या नवऱ्याचा हार घातलेला फोटो. पलीकडच्या भिंतीवरून हा फोटो इथे आला कसा ? नक्कीच आत्यानी लावला असणार. बाजूला बघितलं तर आत्या उठून भिंतीला टेकून बसल्या होत्या. आणि एकटक माझ्याचकडे बघत होत्या. माझ्याबद्दल एक वेगळयाच प्रकारची काळजी त्यांच्या डोळयात दिसत होती. मी तशीच उठून अंथरूण घडी करू लागले तर त्यांनीच मला विचारलं.

“ विचारणार नाहीस, मी फोटो इथ का लावला ? “

मी नकारर्थी मान डोलावली. त्या उठून माझ्याजवळ आल्या. आज या अशा का वागतआहेत हेच कळत नव्हतं. माझा हात हातात घेऊन त्या म्हणाल्या,

“ मला कळतेय तुझ्या मनातली घालमेल……………ही अशीच राहू दे पोरी….. नीट लक्ष देऊन ऐक……….. नवरा मेलेली बाई म्हणजे गोलाकार धगधगत्या आगीत अडकलेलं बाईचं नागवं धड असतं. नरड्यापतूर लागलेल्या त्या आगीचा चटका सोसता सोसत नाय पण तीच आग त्या नागव्या धडाला झाकत असते. तिची अब्रू त्या आगीत सुरक्षित असते. अशावेळी वाटतं की कोणीतरी बाहेरून हात द्यावा आणि त्या हाताला धरून बाहेर यावं. त्यानं दिलेल्या साडीत लाज झाकून ठेवावी पण ती साडी त्याची असते, त्याने परत काढून घेतली तर………… ? “

माझ्या उरात अचानक जाळ उठल्यासारखं झालं. आत्या पुढं सांगत होत्या.

“ माझं काय ? तुझ्यासाठी आणि या तान्ह्या लेकरासाठी डोळे उघडे आहेत माझे. झाकायला कितीसा उशीर लागणार हाय मला. पण माझा विश्वास हाय तुझ्यावर, तू तुझ्या सुखासाठी या लेकरापासून त्याची आई हिसकावून घेणार नाहीस............ “

“ पण आत्या........ तो मला, समर्थला आणि तुम्हाला पण सांभाळेल. “ मी मधेच माझी बाजू मांडली.

“ व्वा पोरे, त्यानं तुझ्या पोराची फी भरली तर तुझी तळपायाची आग मस्तकाला गेली होती आणि आता तू त्याच्या पैशाने आम्हाला सांभाळणार. आता कुठं गेला तुझा अभिमान, तुझी हिम्मत आणि स्वताच्या हिमतीवर जगण्याची जिद्द ? त्याच्या उपकाराखाली तू तुझंच आस्तित्व गमावून बसशील आणि मध्येच जर का त्याने साथ सोडली ना तर त्यावेळी तुझ्याकडे तुझं नागवं धड लपवायला ही आग ही नसेल आणि त्यावेळी तुझ्यातल्या जिद्दीने, हिमतीने, तुझ्या अभिमानाने तुझी साथ सोडलेली असेल. आणखीन एक गोष्ट, एखादे वेळी माझ्या नजरेतून उतरलीस तर चालेल पण जर समर्थच्या नजरेतून उतरलीस ना तर मरण सुदधा जवळ नाही करणार तुला................ “

आत्यांच्या या शब्दाने मला आठवण करून दिली की मी एक विधवा आहे आणि माझं एक सोन्यासारखं लेकरू आहे. आत्यांचं म्हणणं पण बरोबरच होतं. या प्रेमाच्या नादात मी कशी काय विसरले की मला कोणाच्या जिवावर नाही तर स्वता माझ्या जिवावर माझं घर चालवायचं आहे.

विचार करता करता मी खाली बसले. एकवेळ नवऱ्याच्या फोटोकडे बघितलं आणि मनोमन त्यांची क्षमा मागितली. आत्या माझ्या समोर बसल्या होत्या. त्यांना मी सगळं सांगून टाकलं. तो मेसेज ही दाखवला तर त्या म्हणाल्या,

“ तू जा त्याला भेटायला आणि सांग त्याला समजावून. तो ही तुझ्यासारखा भरकटलाय. त्याला कुठेतरी दुसरीकडे खोली घ्यायला सांग. जर नाहीच घेतली तर आपण ही खोली भाड्यानं देऊ आणि दुसरीकड जाऊन राहू. “

मी आत्यांच्या गळ्याला पडून ढसाढसा रडू लागले. मला माझ्या जबाबदारीची जाणीव झाली होती. मी ठरवलं की माझ्या सुखासाठी मी समर्थच्या आयुष्याशी खेळणार नाही. त्याला माझ्याशिवाय कोणीच नाही आणि मीच जर दुसऱ्या कोणाची झाली तर अगोदरच बाप गमावलेलं माझं लेकरू आई सुदधा गमावून बसेल.

शेवटी समर्थसाठी मी माझ्या प्रेमाचा त्याग करायचं ठरवल. पण ज्याप्रमाणे मी समजले आणि यातून बाहेर आले तसा तो समजेल का ? आणि यातून बाहेर येईल का ? या गोष्टीची एक मोठ्ठी काळजी होती.

मी त्याचा मेसेज पुन्हा एकदा वाचला.

“ नाही आलीस तर माहीत नाही मी काय करेन. “ ह्या शेवटच्या वाक्याने तर मला घाबरवूनच सोडलं.

***

चार वाजता समर्थला घेऊन मी दारातून बाहेर आले तेंव्हा आतून आत्यांचा आवाज आला.

“ लक्षात राहू दे, मी वाट बघतेय..................... “

त्यांचं हे वाक्य काळीज चिरून आत शिरलं.

“ तुम्ही पण चला ना सोबत........... “ आत्या सोबत असतील तर त्याला समजावायला सोप्पं जाईल असं वाटत होतं. पण आत्या आल्या नाहीत. त्या म्हणाल्या,

“ हा तुझा प्रश्न आहे, तू तुझ्यापरीनं सोडव. आता आहे मी........ पण प्रत्येकवेळी नसेन तुला समजवायला. “

समर्थचा हात घट्ट पकडून मी घर सोडलं. मी दिलेला टी-शर्ट घालून तो त्या ब्रिजखाली उभा होता. अगदी माझ्या स्वप्नातल्या राजकुमारासारखा दिसत होता पण तो माझा नव्हता. मला बघताच तो खूप खुश झाला. जवळ गेल्या गेल्या त्याने समर्थला उचलून घेतलं आणि बाजूला उभ्या असलेल्या रिक्षात आम्ही बसलो.

रिक्षा समुद्रकिनारी पोहचूपर्यन्त तो एकटक माझ्याचकडे बघत होता. मला ही त्याच्या नजरेत सामावून जावावं असं खूप वाटायचं पण असं करून मला माझंच काम अवघड करून घ्यायचं नव्हतं. त्यामुळे मनात नसताना सुदधा उगाचच बाहेर बघत होते. चौपाटीवर पोहचल्यावर पाणी बघून समर्थ किनाऱ्यावर खेळायला गेला. मी आणि तो तिथेच वाळूत बसलो.

बसल्या बसल्या त्याने हळूच माझा हात हातात घेतला आणि म्हणाला,

“ चांगला नाही दिसत का मी आज? “

“ नाय चांगला दिसतोयस. “ मी पहिल्यांदा त्याच्याकडे बघत उत्तर दिलं.

“ नाही, मगापासून बघतोय, तू माझ्याकडे बघत नाहीयेस म्हणून म्हणलं. “

“ तसं नाही, मला खूप भीती वाटतेय. आपण जे करतोय ते बरोबर नाहीये....... “ मला सुरुवातीपासूनच त्याला समजावायला सुरुवात करायची होती.

“ बरोबर कसं नाहीये ? माझं तुझ्यावर प्रेम हाय, तुझं माझ्यावर हाय आणि प्रेम करणं काय चुकीचं नाय..... “

“ प्लीज समजून घेण्याचा प्रयत्न कर........... मी एक विधवा आहे, माझ्यावर माझ्या मुलाची, आत्यांची जबाबदारी आहे. त्यांना सोडून मी तुझ्याकडे नाही येऊ शकत........................ “ मी अजून पुढे बोलणार होते पण त्याने मला मध्येच थांबवलं आणि म्हणाला,

“ एक मिनिट मनिषा, मी कुठे म्हणलो, तू त्यांना सोडून ये म्हणून. मी तुम्हा सगळ्यांची जबाबदारी घ्यायला तयार हाय........... “

“ हे बोलणं सोप्पं आहे पण करणं तितकच अवघड.................. “

“ म्हणजे तुझा विश्वास नाय माझ्यावर..... “ तो मध्येच बोलला.

खूप प्रयत्न केला पण तो काही केल्या ऐकायला तयार नव्हता. शेवटी तो एकदम रागाने उठला आणि त्याने माझा हात गच्च पकडून मला ही उठवलं आणि म्हणाला,

“ ठीक हाय, तुला जर भीती वाटत असल ना तर आपण लग्न करू............. “

तो इतक्या सहजपणे बोलत होता, जणूकाही हे सारं सहज शक्य होईल. मी रागाने त्याच्या हातातून हात सोडावून घेतला आणि पटापट चालत समर्थकडे गेले. तो ही माझ्या मागोमाग येत म्हणाला,

“ कुठं चाललीस तू................. “

" हे बघ आनंद, तुझा मार्ग वेगळाय आणि माझा मार्ग वेगळाय. तू तुझ्या वाटेने जा आणि मला माझ्या वाटेने जाऊ दे.................... आणि एक विनंती आहे तुला.......... जमल्यास घर बदल............. "

पाय उचलत नव्हता पण इतकं सारं मी हिम्मत करून बोलले होते आता शेवटच्या क्षणी मला परत मागे फिरून बघायचं नव्हतं. पापण्यांनी खूप प्रयत्न केला पण आतले अश्रु पापण्यांचा बांध तोडून बाहेर आलेच. पदराने डोळे पुसत मी जवळच्या रिक्षात बसले. यावेळी मात्र मला राहवल नाही.

तो त्याच ठिकाणी उभा राहून माझ्याकडे अवसान गळून गेल्यागत बघत होता. त्याचे डोळे मला त्याचं प्रेम समजून घेण्याची भीक मागत होते. त्याचा तो अवतार पाहून माझं मलाच अपराधी असल्यासारखं वाटलं. मीच जबाबदार होते त्याच्या या परिस्थितीला. त्याच्या प्रेमात आकंठ बुडताना आणि त्याला माझ्या प्रेमात पाडताना मला माझं लेकरू आठवलं नाही. आणि आज आठवतय.

मी वारंवार मोबाईलकडे बघत होते. वाटत होतं की तो फोन करेल पण फोन आलाच नाही. भीती वाटत होती की रागाच्या भरात तो काहीतरी विचित्र करून तर नाहीना बसणार.

लवकर घरी आल्यामुळे आत्यांच्या चेहऱ्यावर मात्र समाधानाचे हसू उमटले. असल्यात त्याच दिवशी गावावरून आत्यांच्या एका जुन्या मैत्रिणीचा फोन आल्यामुळे त्या आणखीनच खुश झाल्या होत्या. त्या खुश होत्या पण मी मात्र शून्यात हरवले होते. स्वतःच्याच हाताने स्वाताचं सुख गटारात फेकल्याचं दुख काही केल्या मनातून जात नव्हतं. रात्री जेवताना आत्या म्हणाल्या,

" मी काय म्हणते, आपण जरा गावाला जाऊन येवूया का ? "

" का ? "

" अग........ शांतीच्या पोराचं लगीन हाय परवा दिवशी, तिची न माझी लहानपणापासूनची दोस्ती. पुढं दोघीलाभी एकाच गावात दिल्यामुळ आमची दोस्ती

काय तुटली नाही. तुझ्या लग्नात बरं नसताना भी अंथरुणातून उठून आली होती. आता मला भी जायला पायजे ना ? “

“ पण आत्या कामात सांगावं लागेल ना ? आणि समर्थची शाळा ? “

“ सकाळी सांग ना फोन करून पटेल बाईला अन खानावळीत काय सारिकाला सांगून टाक, ती जाऊन सांगल. “

“ पण आत्या................ “ मला मधेच थांबवून आत्या परत पुढे म्हणाल्या,

“ गावातल्या माणसात दोन दिवस राहशील तर तुलाच या सर्वातून निघायला मदत होईल. आणि त्याला पण दोन दिवस भेटतील तुला विसरायला. नको म्हणू नकोस, असं समज की देवानं तुला एक मोका दिलाय या सर्वातून बाहेर पडायला. “

रात्रभर मी आत्यांच्या बोलण्याचा विचार करत होते. त्या इतक्या काळजीने बोलायच्या की त्यांचा शब्द नि शब्द मला पटायचा. तसेपण सकाळी उठून परत त्याचा चेहरा बघितला की परत त्याच्याकडे आकर्षित होईन याची भीती ही होती.

सकाळी त्याला न सांगताच आम्ही ट्रेन पकडली. ट्रेन अजून सुटणार होती की तेवढ्यात माझा फोन वाजला. त्याचाच फोन होता. मी एकवेळ आत्यांकडे बघितलं. त्यांनी डोळ्यांनीच फोन उचलण्याचा इशारा केला. फोन उचलून मी कानाला लावला.

“ हॅलो मनिषा, कुठ हायस तू ? “

“ का ? “

" मी रातभर विचार केला. झोप नाय लागली मला. डोळे बंद केले की तूच दिसतेस अन उघडले की तूच दिसतेस. मी नाय जगू शकत तुझ्याशिवाय. प्लीज समजून घे ना.............. "

" मला कळतय पण.................................. "

" तुला कळतय अन मग तू अशी का करायलीस ? तुला विश्वास नाय लागत ना माझा तर ठीक हाय, म्या आजच सांच्याला पकडतो बस आणि जातो गावाला. आप्पांना सांगून टाकतो – मी लगीन करीन तर फक्त तुझ्याशीच, नायतर कुणाशीच नाय. मग ते मानले तर ठीक नायतर आपण मुंबईत कोर्टात लगीन करू.............................. "

मी फोन कानावरून बाजूला काढला. तो पुढे बरेच काही बोलत होता. आत्यानी माझ्या हातातून फोन घेऊन कट केला आणि बंद करून टाकला.

समर्थ खिडकीतून बाहेर त्याचं नवीन जग पाहत होता. त्याच्या बाजूला बसलेल्या आत्यानी माझं डोकं त्यांच्या मांडीवर ठेवलं आणि म्हणाल्या,

" शांतपणे झोप........... होईल सगळं ठीक. "

आत्यांच्या मांडीवर झोपल्यावर मीपरत पाच सहा वर्ष मागे निघून गेले. लग्नाअगोदर मी अशीच आईच्या मांडीवर शांतपणे झोपून माझ्या आयुष्यातल्या राजकुमारचं स्वप्न बघत पडून राहायची.

डोळे बंद केल्यावर वाटायचं की चालत्या ट्रेनमधून उडी मारावी आणि त्याच्याकडे पळत जावं आणि डोळे उघडल्यावर मी अजून आत्यांच्या मांडीवर झोपलेली आहे हे बघून समाधान वाटायचं.

***

गावात आल्यावर मात्र एक वेगळच जग बघितल्यासारखं झालं होतं. जो तो त्याच्या घरी चहा प्यायला घेऊन जात होता. माझ्यासाठी एक वेगळीच सहानुभूती गावातल्या बायकांच्या मनात होती. तिथे गेल्यावर वाटलं की माझी खरी माणसं तर इथे आहेत.

“ स्वताला एकटं समजू नकू मनिषा, काय लागलं-सवरलं तर लगीच फोन करायचा. तुझ्या नवऱ्याचा लय जीव बाई तुझ्यावर............... जवा जवा गावाला यायचा तवा तवा गावातल्या पाची देवाम्नी नारळ फोडायचा अन कधी ईचारलं....................... दर बारीला का फोडतुस म्हणून.......... तर म्हणायचा............ बायकूसाठी. “

इथल्या बाया मला माझ्या नवऱ्याची आठवण करून देत होत्या आणि काहीजणी तर देवाला शिव्या ही घालत होत्या.

सगळीच माणसं माझं तोंड भरून कौतुक करत होते. म्हणायचे,

“ तुमच्या मानेच्या घराला जर पुढ घिऊन कोण जाईल तर तूच बघ. तुझी थोरली जाऊ आणि मोठा दीर – काही कामाची नाहिती. तुझा दीर तर दिस न रात दारूतच बुडालेला असतो अन तुझी जावबाई तर वेड्यासारखं काहीही बडबडत असतय. आता तू सोताला या घरची सून नसून ल्योक हाय असं समज. तुझ्या सासुला तर लय कौतुक तुझं. असच हिमतीन जग बाई........ आम्ही आहूत तुझ्या पाठीशी. “

6)

गावाकडे आल्यावर मात्र मी खरच त्याला विसरून गेले होते. कधी कधी मनात यायचं की मुंबई सोडून यावं परत गावाला, पण इथ इंगरजी शाळा नव्हती म्हणून हा विचार पुढे ढकलला. रात्री हळदीचा कार्यक्रम जोरात चालू होता. नवरदेवाला हळद लावून मी बाहेर आलेच होते की फोन वाजू लागला. त्याचाच फोन होता. आता एवढ्या रात्री त्याने का फोन केला असावा. मी थोडसं दूर जाऊन फोन उचलला.

" हॅलो मनिषा, कुठं हायस तू ? "

" का ? तुला काय करायचय ? तुला सांगितलं होतं ना फोन नको करूस म्हणून. "

" हे बघ मनिषा, मी नाय जगू शकत तुझ्याशिवाय. प्लीज समजून घे. "

त्याच्या आवाजात माझ्यासाठी खोलवर प्रेम असल्याच जाणवत होतं पण मी मनाचा पक्का निर्धार केला होता की आता काही केल्या पुढ जायचं नाही.

" तुला माझ्याशिवाय जगावं लागेल आणि परत फोन नको करूस मला." मनात नसताना सुदधा मी त्याला बजावलं.

" मला माहितेय तू असं का बोलतेयस ते..................... म्हणून तर आलो होतो गावात पण अप्पानी काय एकलं नाय माझं. आता मी परत ट्रेनला बसलोय. सकाळी आठला दादर स्टेशनला पोचेन. तू पण पोच. तिथून डायरेक्ट आपण कोर्टात जाऊ आणि लगीन करून टाकू. "

“ मी नाय येणार................ “

“ तू येणार, मला पक्क महितेय.............. जर नाय आलीस तर.................... “

तो पुढ काही बोलणार इतक्यात पाठीमागून माझ्या हातातून कोणीतरी फोन हिसकावून घेतला. मागे वळून बघितलं तर आत्या होत्या. त्यांनी फोन कट करून परत बंद केला आणि स्वताजवळच ठेवला. रागाने माझ्याकडे बघत त्या निघून गेल्या.

त्या रात्री काही केल्या झोपच लागत नव्हती. माझा त्याच्यावर विश्वास होता मग का म्हणून मी स्वताला त्याच्यापासुन दूर घेऊन चाललीय ? एकवेळ गावातल्या बायांशी बोलून बघू का ? एखादी तरी समजून घेईलच की. सकाळी आठ वाजता त्याच्याजवळ पोहचणं तर अशक्यच होतं. मग माझी वाट बघून शेवटी तो काय करेल ?  रागाने मला फोन करेल पण त्याचा फोन लागणार कसा ? कारण आत्यानी तो केंव्हाच बंद केला आहे.

तो सरळ माझ्यागावी तर नाही ना येणार ?

हा विचार मनात आल्यावर मी उठूनच बसले. एक मन म्हणत होतं की त्याने येऊन जर का काही धुमाकूळ घातला तर गावातल्या लोकांसमोर माझी काहीच इज्जत नाही उरणार. तर दुसरं मन म्हणत होतं की आला तर बरच होईल. कोणीतरी माझ्याकडून बोललं तर गावातल्या लोकांच्या मध्यस्थीने आमचं लग्न ही होईल.

सकाळ झाली. घड्याळातले काटे मनातल्या विचारांसारखे पळत होते. आठ वाजले आणि उरात एक जोराची कळ आली. आतल्या आत अंग थरथरत असल्यासारखं जाणवू लागलं. एवढी माणसं होती आजूबाजूला पण एवढ्या माणसात मी एकटी असल्यासारखं जाणवत होतं. हळूहळू का होईना पण मनातले प्रश्न कमी होऊ लागले. कुठलीतरी अदृश्य शक्ती मला बोलावत असल्यासारखं वाटू लागलं आणि

मग अचानक डोळ्यांसमोर अंधार पसरू लागला. त्या अंधारात मी समर्थला आणि आत्याला शोधत होते पण ते काही सापडत नव्हते. मी जोरजोराने त्यांना हाक ही मारत होते पण माझी हाक मलाच ऐकू येत नव्हती.

काहीतरी विचित्र होत होतं माझ्याबरोबर. आता तर डोळयांबरोबर हाता पायातली शक्ती सुदधा कमी कमी होऊ लागली. मला माझ्या शरीराचं ओझं पेलेनासं झालं. आणि मग शेवटी पोटामध्ये एक गोळा आला. असह्य वेदना होऊ लागल्या. माझ्या पोटामधून काहीतरी तोंडावाटे बाहेर पडू इच्छित होतं. हळूहळू तो गोळा पोटातून छातीत आला. तिथून नराड्यात आणि शेवटी तोंडातून बाहेर पडला.

त्या काळयाकुट्ट अंधारात मला माझ्या तोंडातून पडलेलं ते लालशार रक्त कसकाय दिसलं हे देवालाच ठाऊक. त्या गोळयाबरोबर मला कळालं की माझ्या आतम्याने माझं शरीर त्यागलं आहे.

आता मात्र मी विसरून गेले की मी आई आहे फक्त आठवत होतं माझं प्रेम. त्या दादर स्टेशनवर माझा आनंद माझी वाट बघत उभा असेल. जिवाच्या आकांताने मी पळत सुटले. आता मी कसल्याच बंधनात नव्हते. बंधने फक्त शरीरासाठी बनलेली असतात, आतम्यासाठी नव्हे. हे त्या दिवशी मला कळलं.

पुढच्याच क्षणी मी दादर स्टेशनवर होते. एक नंबर प्लॅटफॉर्मवर तो माझी वाट बघत अजूनही उभा होता. त्याला बघताच मी वाऱ्याच्या गतीने पायऱ्या उतरु लागले. मला बघितल्यावर त्याचं ही गळालेलं अवसान परत आलं. हातातली बॅग खाली टाकून त्याने दोन्ही हात माझ्या स्वागतासाठी खुले केले. त्याच्या उघड्या छातीवर मी माझं सारं शरीर झोकून दिलं. त्याने सुदधा मला गच्च मिठ्ठी मारली. त्याच्या मिठ्ठीत मला स्वर्ग जाणवत होता. त्याच्या चुंबनाचा वर्षाव पावसाच्या रिमझिम थेंबांसारखा साऱ्या शरीराला समाधानान भिजवत होता. कितीतरी वेळ आम्ही एकमेकामध्ये विरघळून गेलो होतो.

अचानक माझी नजर आजूबाजूच्या लोकांवरून गेली. कोणाचच आमच्याकडं लक्ष नव्हतं. सारेजण आपापल्या जगात मग्न होते. कोणी ट्रेनची वाट बघत

उभे होते तर काहीजण ट्रेनमधून उतरून निघाले होते. या माणसांच्या गर्दीमध्ये मला समर्थ दिसला.

त्याचे कपडे फाटलेले होते. केसांना कितीतरी दिवसांपासून तेल लावलेलं नव्हतं. पोटात पोट गेलेला समर्थ कितीतरी दिवसापासून उपाशी वाटत होता. त्याच्या हातामध्ये पितळेचं एक भांडं होतं आणि तो तिथे उभ्या असलेल्या माणसांकडून भीक मागत होता. त्याची ती अवस्था बघून मला काय झाल कुणास ठाऊक, मी आनंदच्या मिठठीतून स्वताला सोडवून घेतलं आणि त्याला जोरात धक्का मारला.

मला मरण्याचा सुदधा अधिकार नव्हता. मी आनंदकडे बघत एक एक पाऊल मागे मागे घेऊ लागले तो मला परत बोलावत होता पण मी त्याला म्हणाले,

“ इथ येऊन मी आपल्या प्रेमाची लाज राखली पण मला परत जावं लागणार. माझ्यातली बाई माझ्यातल्या आईसमोर नाही जिंकू शकणार. “

आणि आता परत मी समर्थकडे पळत सुटले.

डोळे उघडले तेंव्हा मी दवाखान्यात होते. एखादा चमत्कार झाल्यासारखा सारेजण माझ्याचकडे बघत होते. एका डॉक्टरने येऊन माझी नस चेक केली. आणि म्हणाला,

“ कशा आहात तुम्ही ? “

मी डोळयानेच जिंवंत असल्याचा इशारा केला. काहीवेळानंतर आत्या आणि समर्थ माझ्या बाजूला येऊन बसले. आत्यानी माझा हात हातात घेतला. माझ्या डोळयाला डोळा भिडवून त्या म्हणल्या,

“ सगळी डाक्टर म्हणत होती की तू नाय वाचणार म्हणून. म्हणत होती की तू जगायची इच्छाच सोडलीय. पण मला माहीत होतं की तू परत येणार. “

मला आत्या एक देव असल्यासारखंच वाटत होत्या. मी मेले होते आणि माझा आत्मा त्याला भेटायला गेला होता आणि मी परत आले होते हे फक्त मलाच माहीत होतं पण आत्याना हे कसं कळलं ते मात्र त्यांनाच ठाऊक. मी त्यांना विचारलं ही नाही. मेलेल्या बाईला जीवनदान दिल्याचं श्रेय मात्र डॉक्टरांनी घेतलं. मरून जिवंत झालेली मी पहिली व्यक्ती असावी कदाचित.

आठवडा भरानंतर आम्ही परत मुंबईला आलो. दवाखान्यातून बाहेर आल्यावर मी फोन चालू केला. वाटत होतं की त्याचा फोन येईल पण त्याचा फोनच काय मेसेज सुदधा आला नाही. दारावर आल्यावर मी एकवेळ त्याच्या गॅलेरीत बघितलं तर त्याचं दार बंद असल्यासारखं दिसलं. आवाराआवर करताना आत्या माझ्याजवळ आल्या आणि म्हणाल्या,

“ मनिषा, तुला एक सांगायचं होतं. “

“ काय ? “

त्यांनी मला खाली बसवलं आणि म्हणाल्या,

“ खरतर मला हे तुला अगोदरच सांगायला पायजे होतं पण धाडसच होत नव्हतं. पण आता दुसऱ्या कोणाकडून कळण्यापेक्षा मीच सांगितलेलं बरं........ “

“ असं काय झालय आत्या.................. “ मी मधेच विचारलं.

“ रक्ताची उलटी केल्यावर तू एकदम जीव गेल्यासारखीच पडली होतीस. गडबडीनं तुला दवाखान्याला घेऊन जात असताना मला सुधामावशीचा फोन आला................ “

“ काय म्हणून ? “

“ दादर स्टेशनवर आनंदानं चालत्या ट्रेनखाली उडी मारून स्वताचा जीव दिला. “

पुढ त्या अजून काय काय सांगत होत्या की मला समजवत होत्या ते त्यांनाच माहीत. मी मात्र सुन्न झाले होते. माझ्या हातून माझ्या प्रेमाचा खून झाला होता. पुढे दोन दिवस तर मला विश्वासच बसत नव्हता की माझ्या आनंदाने आत्महत्या केली म्हणून...................... मी त्याच्यावर विश्वास ठेवायला हवा होता.

जगासाठी जरी आनंद मेला असला तरी माझ्यासाठी तो जिवंत होता. दादर स्टेशनवर एक नंबर फलाटावर तो अजूनही माझी वाट बघतोय. अधून मधून जाते मी त्याला भेटायला. कितीतरी वेळ आम्ही हातात हात घालून बोलत असतो एकमेकाबरोबर.

मी त्याला वचन दिलय.............

एकदा का समर्थला त्याच्या बायकोच्या स्वाधीन केलं की मी सारंकाही सोडून त्याच्याकडे पळत येईन.

आणि तो ही माझी वाट बघतोय.

आई आणि बाई या दोघींच्या लढाईत जरी आई जिंकली असली तरी मी माझं बाईपण अजून टिकवून ठेवलं आहे. आई जिंकून जेवढी समाधानी नाहीये तेवढी बाई हरून समाधानी आहे..................


# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. महाराष्ट्राच्या जवळपास प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांत ई साहित्य चे वाचक आहेत. याशिवाय सुमारे तीस ते चाळीस लाख वाचक ई साहित्यच्या वेब्साईटला भेट देऊन पुस्तके डाऊन लोड करतात. पण याने आमचे समाधान नाही. जोवर महाराष्ट्रातील प्रत्येक साक्षर हा वाचक होत नाही तोवर ही चळवळ चालेल. आमचे लक्ष्य सहा कोटींचे आहे. आमच्या पाठीशी माऊलींचा आशिर्वाद आहे. “ ईये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी” ही त्यांची प्रार्थना आपणा सर्वांकरवी सुफ़ळ संपूर्ण व्हावी.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!


ई साहित्य प्रतिष्ठान
ई साहित्य • ई पुस्तके • ई साहित्य • ई पुस्तके •
www.esahity.com
esahity@gmail.com